म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय [illegible]
दा. क्र. १६५५८
IRBK-0116459
IRBK-0116459

किशोर कथा : : २ : :

क्र. ९५५४६९
दि.

# मंगल कथा

भाग दुसरा

लेखक
मा. गो. काटकर

IRBK-0116459
IRBK-0116459

किंमत
...पये पन्नास पैसे

मंगल प्रकाशन, नागपूर १०

© मंगल प्रकाशन

* * *

प्रकाशिका :
सौ. वीणा तिजारे,
मंगल प्रकाशन,
८५, माधव नगर, नागपूर १०

* * *

मुद्रक :
श्या. श्री. ब्रनहट्टी,
श्रीनिवास मुद्रणालय,
सुविचार प्रकाशन इमारत
धनतोली, नागपूर १२

* * *

पुनर्मुद्रण : मार्च १९७५

* * *

मूल्य : ३·५० रुपये

# हितगूज

माझ्या किशोर मित्रांनो,

ह्या घ्या खूप मजेदार कथा. पुन्हा पुन्हा रंगून वाचण्यासारख्या आणि दंग होऊन वाचून दाखविण्यासारख्या.

या कथा रहस्यमय व अद्‌भुत तर आहेतच. शिवाय तुम्हाला नेहमीच पसंत असणारे, साहस, शौर्य, चातुर्य, दातृत्व, प्रसंगावधान आणि असलेच काही यशाची वाटचाल करण्याकरिता आवश्यक असणारे, हे देखील या कथात तुम्हाला आढळेल. या कथासंग्रहात नव्याने नटलेल्या काही लोककथा आहेत. काही कथा, परकीय कथांच्या रूपरेखातून वेगळ्या थाटामाटाने निर्माण झाल्या आहेत आणि काही स्वतंत्र आहेत.

अशा या सरस व सुरस कथा सुंदर सजवून 'मंगल कथामालेच्या' चार भागातून, तुमच्या उत्सुक हाती देण्याची गोड कामगिरी तुमच्या व माझ्या प्रकाशिका सौ. वीणा तिजारे; तसेच चित्रकार श्री. सुधाकर खाजगीवाले, यांनी केलेली आहे. त्यांना माझे हार्दिक धन्यवाद.

या कथामालेची द्वितीय आवृत्ती काढण्याचा योग आणला त्याबद्दल किशोर मित्रांना मन:पूर्वक धन्यवाद.

मार्च<br>१९७५

मा. गो. काटकर<br>सोलापूर २

## अनुक्रम :


१. वीरसेनाची युक्ति ५

२. नशिबाची परीक्षा १५

३. दीनपालाची कहाणी ३५

४. समाधानाची संपत्ती ४६

५. देवाने दिले–कर्माने मिळविले ५५

६. गणपतीची देणगी ६३

७. बाळकृष्णशास्त्री ७१


**श्री. मा. गो. काटकर**

यांचे

प्रकाशित बालवाङ्मय

१. राजकन्या हेमलता
२. रत्नमाला
३. गाणारा पक्षी
४. वनमाळी व वासंती
५. वनवासी
६. रानपाखरे
७. सुहासिनी
८. आनंदाची कथा
९. बोलक्या कथा
१०. नवलाच्या कथा
११. मुलांची गाणी
१२. आटपाट नगरात
१३. पिंपळपाने
१४. विवेकानंद–जीवनदर्शन



# वीरसेनाची युक्ति

कांचन नगराच्या शूरसेन राजाच्या पदरी वीरसेन नावाचा एक शूर सरदार होता. पुष्कळ लढायात त्याने शौर्य दाखविल्यामुळे शूरसेन राजाची त्याच्यावर विशेष मर्जी बसली होती. पुढे मागे तो सेनापती होईल या भीतीने काही सरदारांनी वीरसेनाविरुद्ध राजाचे मन कलुषित केले. हलक्या कानाच्या शूरसेनाने अविचारीपणाने वीरसेनाला आपल्या नोकरीतून मुक्त केले आणि त्याला फक्त दहा मोहोरा देण्याचा हुकूम आपल्या

कोषाधिकाऱ्यास दिला. स्वार्थी सरदारांच्या सांगण्यावर विश्वास ठेवून शूरसेनाने आपली मानहानि केली याचे वीरसेनाला फार दु:ख झाले आणि खूप संतापही आला. तो म्हणाला, " शूरसेनाने माझी किंमत फक्त दहा मोहोराच केली आहे. ठीक आहे. मला जर माझ्या मनाप्रमाणे मित्र भेटतील तर शूरसेनाच्या राज्यातील सर्व संपत्ती मी त्याच्या जवळून घेईन. "

आपल्या प्रतिज्ञापूर्तीसाठी, मित्र मिळविण्याकरिता वीरसेन प्रवासाला निघाला. प्रवास करता करता तो एका गर्द अरण्यात आला. तेथे त्याने एक दणकट शरीराचा माणूस एक झाड उपटीत असलेला पाहिला. ते दृश्य पाहून वीरसेनाला फार आश्चर्य वाटले. हा माणूस आपला मित्र होण्यास योग्य आहे अशा विचाराने तो त्या माणसाकडे जाऊ लागला. तेवढ्यात त्या माणसाने गवत उपटावे तसे ते झाड उपटले आणि ते जमिनीवर आडवे टाकून त्याच्या फांद्या हातानेच तोडू लागला. वीरसेन त्याला म्हणाला, " तू कोण आहेस ? तुझे नाव काय ? " तो माणूस म्हणाला, " माझं नाव प्रचंडसेन, मी लाकूडतोड्या आहे. " वीरसेन म्हणाला, " माझं नाव वीरसेन, मी जगाच्या प्रवासाला निघालो आहे. तू माझ्या बरोबर येशील काय ? " " होय, माझी तयारी आहे. जग कसं आहे ते मलाही पहायचं आहे. थोडं इथंच थांबा, हे जळण घरी टाकून येतो ", असे आनंदाने म्हणत प्रचंडसेनाने जमिनीवर ठेवलेले झाड सहजतेने उचलून खांद्यावर टाकले आणि झपझप पावले टाकीत तो तेथून चालता झाला.

लवकरच प्रचंडसेन परत आला. तो वीरसेनाला म्हणाला, " चला, तुमच्याबरोबर प्रवास करताना जगातील खूप गंमती जमती मला पाहण्यास मिळतील. "

वीरसेन प्रचंडसेनाला घेऊन पुढे निघाला. काही मैल चालून गेल्यानंतर त्यांना एक शिकारी दिसला. त्याने आपल्या धनुष्याला बाण लावला होता, आणि तो एकटक समोर बघत होता. समोर तर काहीच दिसत नव्हते. ते पाहून वीरसेन व प्रचंडसेन यांना फार आश्चर्य वाटले. ते दोघे त्या शिकाऱ्या जवळ गेले. वीरसेन त्या शिकाऱ्यास म्हणाला, "समोर तर काहीच दिसत नाही. तू कोणावर नेम धरला आहेस? कोण तू?" तो शिकारी म्हणाला, "मला नेमसेन म्हणतात; इथून एक मैलावर असलेल्या चिंचेच्या झाडावर एक ससाणा बसला आहे. त्याच्या डाव्या डोळयावर मी नेम धरलेला आहे."

"अस्सं! फारच छान." वीरसेन आनंदाने म्हणाला, "नेमसेन, माझं नाव वीरसेन. मी आणि हा प्रचंडसेन आम्ही दोघेही जगाच्या प्रवासाला निघालो आहोत. प्रवासात तुझ्यासारखा मित्र आम्हाला मिळाला तर फार चांगले होईल. येतोस का आमच्या बरोबर?"

"बरं झालं. जग पहावं असं बरेच दिवस माझ्या मनात आहे. तुमच्यासारखे सोबती मिळाले हे माझं भाग्य. चला," नेमसेन पुढे पाऊल टाकीत म्हणाला.

काही अंतर चालून गेल्यानंतर त्यांना एक धुळीचा लोट दिसला. त्याच्या जवळ ते जाऊ लागताच तो लोट नाहीसा झाला. पण आसपासच्या झाडावरील पिकलेली पाने जोराच्या वाऱ्याने गिरक्या घेत खाली पडत होती. वीरसेन, प्रचंडसेन व नेमसेन यांना वाऱ्याचा स्पर्शही होत नव्हता. मग झाडापुरताच जोराचा वारा कोठून येत आहे याचे त्या तिघांनाही मोठे आश्चर्य वाटू लागले. सुमारे दोन मैल चालू गेल्यानंतर एका झाडाच्या उंच फांदीवर

बसलेला एक माणूस त्यांना दिसला. त्या माणसाने हाताच्या अंगठ्याने आपली एक नाकपुडी बंद केली होती आणि दुसऱ्या नाकपुडीने तो जोरात श्वास बाहेर सोडीत होता.

वीरसेन त्याला म्हणाला, "तू कोण आहेस ? झाडाच्या उंच फांदीवर बसून काय करीत आहेस ?" तो माणूस खाली पहात म्हणाला, "माझं नाव फुंकरसेन ! तुम्ही इकडे येताना जोराच्या वाऱ्यानं काही झाडांवरची गळून पडणारी पाने पाहिलीत ना ? नाकपुडीच्या एका फुंकरीने मी ती पाने उडवून लावीत आहे. माझा तो आवडता छंद आहे." "वा छानच आहे." वीरसेन म्हणाला "हे पहा फुंकरसेन, मी, प्रचंडसेन व नेमसेन यांना बरोबर घेऊन जगाच्या प्रवासाला निघालो आहे. तू जर आमच्या बरोबर आलास तर आपला प्रवास मोठ्या मजेत होईल. मग येतोस का आमच्याबरोबर ?" "तुमची मैत्री मला मोठी लाभदायक होईल असं मला वाटतं, चला मी येतो तुमच्या बरोबर," असे म्हणून फुंकरसेन झाडावरून खाली उतरला. त्याच झाडाखाली सर्वांनी थोडी विश्रांती घेतली आणि मग त्यांचा पुढचा प्रवास सुरू झाला.

वीरसेन आपल्या मित्रांबरोबर काही मैलांचे अंतर चालून गेला नाही तोच त्याला एका झाडाखाली आपल्या पायांना मालीश करीत बसलेला एक माणूस दिसला. वीरसेन त्याच्या जवळ गेला आणि त्याला म्हणाला, "तू कोण आहेस ? व इथं काय करीत आहेस ?" तो मनुष्य थोडे हसून म्हणाला, "माझं नाव चपळसेन, धावण्याच्या शर्यतीत वाऱ्याला मागं टाकून आताच मी इथं येऊन विश्रांतीसाठी बसलो आहे, तुम्ही कोण ?" वीरसेनाने त्याला आपली व आपल्या मित्रांची ओळख करून दिली व पुढे तो म्हणाला,

"जग पहायला तूही आमच्या बरोबर चल." चपळसेन मोठ्या आनंदाने त्यांच्याबरोबर जाण्यास तयार झाला.

आपल्या सर्व मित्रांसह वीरसेनाने चार वर्षे खूप प्रवास केला. नंतर सर्वांना घेऊन तो कांचन नगराकडे निघाला. नगराच्या वेशीत येताच वेशीच्या दरवाज्यावर अडकविलेला जाहीरनामा त्याने पाहिला. त्यात लिहिले होते की, "जो कोणी राजकन्ये-बरोबर धावण्याच्या शर्यतीत भाग घेऊन ती जिंकेल त्याच्याशी राजकन्या लग्न करील." वीरसेनाने मनाशी एक बेत ठरविला व आपल्या मित्रांना घेऊन त्याने एका धर्मशाळेत मुक्काम केला.

दुसऱ्या दिवशी वीरसेनाने शूरसेन राजाची भेट घेतली. राजाने त्याला ओळखले नाही. वीरसेन म्हणाला, "महाराज, आपल्या जाहीरनाम्याप्रमाणे माझा मित्र धावण्याच्या शर्यतीत भाग घेणार आहे."

"अस्सं ! ठीक आहे," शूरसेन म्हणाला, "पण, लक्षात ठेव जर का तुझा मित्र शर्यतीत हरला तर त्याला आपला प्राण गमवावा लागेल आणि तुझ्यावरही तीच पाळी येईल."

"त्यालाही आमची तयारी आहे," असे म्हणून वीरसेन राजवाड्याच्या बाहेर पडला. धर्मशाळेत आल्यावर त्याने घडलेली सर्व हकीकत आपल्या मित्रांना सांगितली. शर्यतीत भाग घेण्यासाठी चपळसेन अधीर झाला. अतिशय सावध राहून ही शर्यत जिंकलीच पाहिजे अशी सर्वांनी चपळसेनाला सूचना दिली.

दुसऱ्या दिवशी सकाळी वीरसेन आपल्या मित्रांना घेऊन राजवाड्याकडे निघाला. तेव्हा रस्त्याच्या दोन्ही बाजूंना लोकांची गर्दी त्याला दिसू लागली. राजवाड्याच्या पटांगणात तर खूप गर्दी दिसत होती. वीरसेन चपळसेनाला घेऊन राजा समोर गेला आणि

म्हणाला, "महाराज, शर्यतीत भाग घेणारा हा माझा मित्र चपळसेन." चपळसेनाने राजाला नमस्कार केला. राजकन्या तेथे होतीच. राजा, राजकन्या व चपळसेन यांना उद्देशून म्हणाला, "तुम्हाला एक सोन्याची झारी देण्यात येईल. येथून पंचवीस मैल अंतरावर असलेल्या डोंगराजवळील झऱ्याचे पाणी त्या झारीत भरून घेऊन प्रथम जो कोणी येईल, त्याने शर्यत जिंकली असा निर्णय दिला जाईल."

इशारा झाल्याबरोबर चपळसेन व राजकन्या वेगाने पळू लागली. राजकन्या काही अंतर पळून गेली तेव्हा तिच्यापुढे असलेला चपळसेन वाऱ्याच्या जोरदार झुळकेप्रमाणे रस्त्याच्या वळणावर दिसेनासाही झाला होता.

थोड्याच वेळात चपळसेन डोंगराजवळ असलेल्या झऱ्याच्या काठी पोहोचला. झऱ्याच्या पाण्याने सोन्याची झारी त्याने भरून घेतली आणि चटकन् तो मागे फिरला; काही मैल पळल्यानंतर त्याला दमल्यासारखे वाटून झोप येऊ लागली. तेव्हा तो एका झाडाखाली गेला. तेथे पडलेला एक मोठा ओंडका त्याने उचलून उशाखाली घेतला. ओंडका ओबडधोबड असल्याने आपणास लवकर जाग येईल असा विचार करून तो झोपला.

इकडे जलद धावणारी राजकन्या झऱ्याजवळ पोहोचली. तिने आपली झारी पाण्याने भरून घेतली. तेथून परत पळत येताना एका झाडाखाली झोपलेला आपला प्रतिस्पर्धी तिच्या दृष्टीस पडला. आता आपण शर्यत जिंकणार अशी तिची खात्री झाली. ती मोठ्या आनंदाने चपळसेनाच्या झारी जवळ गेली. तिने ती उलटी करून तिच्यातील सर्व पाणी सांडून टाकले. आणि आपली भरलेली झारी घेऊन ती अधिकच वेगाने पळू लागली.

राजवाड्यापासून जवळ असलेल्या एका टेकडीवर उभा राहून नेमसेन आपल्या तीक्ष्ण दृष्टीने पहात होता. राजकन्या शर्यत जिंकणार व आपला मित्र प्राण गमावणार असे त्याला दिसल्याबरोबर त्याने आपल्या धनुष्यातून बाण सोडला. त्या बाणाने चपळसेनाच्या डोक्याखालील ओंडका उडवून लावला. चपळसेन जागा झाला आणि ताडकन उठून उभा राहिला. जवळच पडलेली रिकामी झारी आणि दूरवर पळत जाणारी राजकन्या त्याच्या दृष्टीस पडली. वाऱ्यालाही मागे टाकून चपळसेन पुन्हा झऱ्याजवळ गेला. त्याने झारी पाण्याने भरून घेतली आणि त्याच वेगाने तो परत फिरला. राजकन्येच्या आधी पाच मिनिटे तो राजवाड्यासमोरील पटांगणात दाखल झाला आणि पाण्याने भरलेली सोन्याची झारी त्याने राजापुढे ठेवली. वीरसेन, प्रचंडसेन, नेमसेन आणि फुंकरसेन यांनी मोठ्या आनंदाने चपळसेनाची पाठ थोपटली. लोकांनी चपळसेनाच्या नावाचा जयजयकार केला.

शूरसेन राजाला व राजकन्येला मात्र मुळीच आनंद झाला नाही. एका सामान्य माणसाने शर्यत जिंकली याचा राजाला विषाद वाटला. आणि अशा माणसाने सर्व लोकांसमक्ष आपली फजिती केली याचा राजकन्येला संताप आला. शर्यतीच्या ठरलेल्या अटीप्रमाणे त्याच्याशी लग्न करण्याची गोष्ट तर तिच्या दृष्टीने अशक्यच होती.

आपणास फार मोठा आनंद झाला आहे असे वरपांगी दाखवीत शूरसेनाने वीरसेन आणि चपळसेन यांचे अभिनंदन केले, आणि आपल्या सर्व मित्रांस घेऊन राजवाड्यात मेजवानीस येण्याबद्दल त्याने वीरसेनास सांगितले.

मेजवानी संपल्यानंतर शूरसेनाने वीरसेनास एका बाजूस बोलावून घेतले. तो वीरसेनास म्हणाला, "शर्यतीच्या अटीप्रमाणे राजकन्येचे लग्न तुमच्या मित्राशी केले पाहिजे. पण माझी हट्टी मुलगी या गोष्टीस तयार नाही. तिच्या इच्छेविरुद्ध लग्न झाल्यास दोघांनाही सुख होणार नाही. तेव्हा तुम्ही राजकन्येवरील तुमचा हक्क सोडलात तर मी तुम्हाला हवे तितके धन देईन." राजाचे बोलणे ऐकत असता वीरसेनाच्या मनात आले, याच राजाने आपली किंमत दहा मोहरा केली होती. आता आपल्या मनासारखे मित्र मिळाले आहेत आणि या शूरसेनाची सगळी संपत्ती हिरावून घेण्याची संधी प्राप्त झाली आहे तेव्हा ती दवडू नये. तो शूरसेनाला मोठ्या नम्रतेने म्हणाला, "ठीक आहे महाराज, आपण म्हणता तसं करायला आमची तयारी आहे. माझा मित्र जेवढी संपत्ती नेऊ शकेल तेवढी त्याला द्यावी. आम्ही पंधरा दिवसांनी आपली भेट घेतो." वीरसेनाचे हे बोलणे ऐकून शूरसेनाला फार आनंद झाला. त्याला वाटले आपल्या मुलीवरचे फार मोठे संकट टळले.

वीरसेनाने आपल्या मनातली योजना आपल्या मित्रांना सांगितली. ती सर्वांना फार आवडली. मग वीरसेनाने शूरसेनाच्या राज्यातील सर्व शिंप्यांना गोळा केले आणि त्यांच्याकडून खूप लांब खूप रुंद, अगदी अवाढव्य असे एक दणकट पोते शिवून घेतले. ते पूर्ण होण्यास चौदा दिवस लागले. पंधराव्या दिवशी, ते अवाढव्य पोते खांद्यावर टाकलेल्या प्रचंडसेनासह वीरसेन आपल्या मित्रां-बरोबर शूरसेनाकडे गेला.ते अवाढव्य पोते आणि ते वाहून आणणारा तो प्रचंड माणूस पाहून शूरसेन आश्चर्याने थक्क झाला. हा माणूस आपली खूप संपत्ती घेऊन जाणार या विचाराने तो घाबरून गेला.

प्रथम शूरसेनाने एक गाडीभर सोने आणण्याची आज्ञा केली. राजाच्या वीस शिपायांनी ते आणले. तेव्हा प्रचंडसेनाने तेवढे सगळे सोने दोन्ही हातांनी उचलून पोत्यात टाकले व तो म्हणाला, "याच्यापेक्षा जास्तच एका वेळेला का आणलं नाही? हे सोने तर पोत्याच्या तळालाही लागले नाही."

नंतर शूरसेनाने हळूहळू आपल्या खजिन्यातील सर्व पैसा, सोने, नाणे आणवून घेतले. मग प्रचंडसेनाने ती सर्व संपत्ती पोत्यात घातली पण ते पोते काही भरले नाही. अर्धे सुद्धा झाले नाही. प्रचंडसेन म्हणाला, "आणा, आणा, आणखी घेऊन या, एवढ्यानं काही भागत नाही."

शूरसेनाने आपल्या राज्यातील सर्व संपत्ती गोळा करून आणली. ती शेकडो गाड्या भरली. ती सर्व प्रचंडसेनाने पोत्यात भरली. तरीही पोते भरले नाही. मग जे जे मौल्यवान मिळेल ते ते प्रचंडसेन पोत्यात टाकू लागला. शेवटी काहीच शिल्लक राहिले नाही हे पाहून तो म्हणाला, "बस्स! पुरे झालं आता. पोतं बांधायला थोडी जागा शिल्लक ठेवली पाहिजे." प्रचंडसेनाने ते अवाढव्य संपत्तीने भरलेले पोते दोन्ही हातांनी उचलून आपल्या पाठीवर टाकले आणि आपल्या मित्रांसह तो तेथून निघून गेला. सर्वात शेवटी वीरसेन होता. त्याने मोठ्या नम्रपणे हसत शूरसेनाला नमस्कार केला आणि तोही निघून गेला.

प्रचंडसेनाच्या राक्षसी सामर्थ्याने स्तंभित झालेला शूरसेन एखाद्या पुतळ्यासारखा तटस्थ उभा होता.

वीरसेन आणि त्याची मित्रमंडळी निघून गेल्यानंतर संतापाने लाल होऊन चरफडणाऱ्या शूरसेनाने आपल्या सेनापतीला आज्ञा केली.

"पाचशे सैनिकांच्या दोन पलटणी घेऊन ताबडतोब त्या पाच माणसांचा पाठलाग करा. त्यांना पकडून आणा. पोते घेऊन जाणाऱ्या राक्षसाला कैद करा. जा, धावा."

दोन अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली शूरसेनाच्या दोन पलटणी वीरसेन आणि मंडळींचा पाठलाग करू लागल्या. वीरसेन आणि त्याचे मित्र दृष्टीस पडल्यावर अधिकारी ओरडू लागले. "थांबा, थांबा, तुम्ही आमचे कैदी आहात, संपत्तीने भरलेले पोते खाली टाका नाहीतर फुकट मरून जाल."

"कसली बडबड चालवली आहे," फुंकरसेन जोरात ओरडला, "तुम्ही आम्हाला कैद करणार! थांबा तुम्हाला थोडे हवेत नाचवतो म्हणजे तुमची मस्ती कमी होईल," असे म्हणून त्याने एक नाकपुडी दाबून धरून दुसऱ्या नाकपुडीने जोरात श्वास सोडावयास सुरुवात केली. त्याबरोबर पाठलाग करीत जवळ आलेल्या दोन्ही पलटणी हवेत उंच उडाल्या. त्यापैकी एक टेकडीच्या उजव्या बाजूकडे पडली आणि दुसरी टेकडीच्या पलीकडे जाऊन पडली. एक शिपाई, "क्षमा करा, क्षमा करा" असे ओरडू लागला म्हणून फुंकरसेनाने एक हळू फुंकर घालून त्याला जवळ ओढून घेतले आणि त्याच्याबरोबर शूरसेन राजाला निरोप पाठविला की त्याचं सगळं जरी सैन्य आलं तर त्याची या दोन पलटणीसारखी दशा होईल."

शूरसेनाला तसा निरोप मिळाल्यावर तो म्हणाला, "त्या पाच माणसांच्या वाटेला कुणी जाऊ नका. देव त्यांचं पाहून घेईल."

शूरसेनाची सर्व संपत्ती वीरसेन, प्रचंडसेन, नेमसेन, फुंकरसेन आणि चपळसेन यांनी सारख्या प्रमाणात वाटून घेतली आणि सर्व आयुष्यभर ते मोठ्या सुखात आणि समाधानात राहिले.



# नशिबाची परीक्षा

एकदा एका नगरात प्रताप नावाचा एक साहसी तरुण राहात होता. साहसी स्वभावामुळे तो आपल्या नशिबाची परीक्षा पाहण्याकरिता प्रवासाला निघाला. पुष्कळ दिवस नगरातून, रानावनातून प्रवास करता करता त्याला एक श्रीमंत दिसणारा उग्र चेहऱ्याचा दाढीवाला भेटला. त्या माणसाने प्रतापला विचारले, "काय रे, कुठं निघाला आहेस ?" "नशिबाची परीक्षा पाहण्यासाठी," प्रताप म्हणाला. "वा, फारच छान, मला अशाच

माणसाची फार जरुरी आहे. मी तुला भरपूर द्रव्य देईन. तू माझ्याजवळ एक वर्ष राहिलास तर मोहोरांनी भरलेली एक थैली मी तुला देईन. दोन वर्षे राहिलास तर दोन थैल्या, तीन वर्षे राहिलास तर तीन थैल्या. पण मी तुला सांगितलेलं कोणतेही काम, मग ते तुला अप्रिय वाटत असलं तरीही, तूं मुकाटयानं केलं पाहिजे. खाण्यापिण्याची, राहण्याची तुझी व्यवस्था मी चांगलीच करीन. सांग, येणार कां माझ्याबरोबर ?" प्रताप म्हणाला. "ठीक आहे. कोणतेही काम करण्याची माझी तयारी आहे. चला."

त्या माणसानं मोठ्या आनंदाने प्रतापच्या पाठीवर थाप मारली. तो हंसत म्हणाला, "असा धीट व निर्भय मुलगा मला आवडतो." प्रताप मुकाटयाने त्याच्याबरोबर चालू लागला. त्याची वाट एका घनदाट अरण्यातून जात होती. त्या वाटेवर तो माणूस प्रतापला म्हणाला, "माझं नाव दुष्टबुद्धी. मी एक फार मोठा जादुगार आहे. हे अरण्य माझ्या मालकीचं आहे. आणि त्याच्या पलीकडे असलेल्या टेकडीतील मोठ्या गुहेत माझा वाडा आहे." यावर प्रतापने नुसता एक हुंकार दिला. त्याच्या मनांत आलं, अशा नावानं आणि कृतीनं दुष्ट असलेल्या माणसाच्या हातांत आपण सापडलो नसतो तर बरं झालं असतं. चांगल्यांची सेवा हितकारक, दुष्टांची सेवा अहितकारक असते. जाऊं द्या. आपण नशिबाची परीक्षा पाहण्यासाठी बाहेर पडलो आहोत. आता कुरकुरण्यांत काही अर्थ नाही. नशिबाने माझी दुष्टबुद्धीशी गाठ घालून दिली यात त्याचा काहीतरी हेतु असावा. अशा विचारांत प्रताप असतानाच दुष्टबुद्धीने त्याला आपल्या भव्य वाड्यांत आणले. त्या ठिकाणी प्रतापने पोटभर जेवण केले आणि लांबच्या प्रवासाने दमल्यामुळे त्याला गाढ झोप लागली.

दुसऱ्या दिवशी सकाळी न्याहारी झाल्याबरोबर तो दुष्टबुद्धीसमोर उभा राहिला. त्याला दुष्टबुद्धी म्हणाला, "माझ्या वाड्याच्या पलीकडे गुहेतच एक मैल लांबीचा गोठा आहे. त्या गोठ्यांत तुला कोल्हे, लांडगे, अस्वले, हरिणे, ससे, पोपट वगैरे प्राणी आढळून येतील. मला वाटले म्हणून माझ्या जादूने मी त्यांना बंदिस्त करून ठेवले आहे. तुझं पहिलं काम म्हणजे त्या सर्व प्राण्यांना तू पोटभर खाऊ घातलं पाहिजे, आणि हे काम फक्त चोवीस तासातच झालं पाहिजे." प्रताप गोठ्यात गेला. तो गोठा नानाप्रकारच्या प्राण्यांनी भरलेला होता. त्या सर्व प्राण्यांना प्रतापने पोटभर खाऊ घातले. या कामी त्याने आपली सर्व शक्ती पणाला लावली. रात्रीच्या सुमारास सगळे काम संपवून तो दुष्टबुद्धीसमोर उभा राहिला. दुष्टबुद्धी म्हणाला, "गोठ्यातील सर्व प्राण्यांना खाऊ घालण्याचं अचाट काम तू चोवीस तासाच्या आतच कसं केलंस याचं मला आश्चर्य वाटतं. ठीक आहे. आता तू फार दमलेला आहेस तेव्हा पोटभर जेवण कर, आणि निवांत झोप घे."

सकाळी दुष्टबुद्धी प्रतापला म्हणाला, "आज गोठ्यातील प्राण्यांना खाऊ घालण्याची गरज नाही. काल तू फारच चांगलं काम केलं आहेस. तेव्हा तूर्त तुला दुसरं काम मी सांगत नाही. तू खुशाल मन मानेल तिकडे फिरायला जा." "ठीक आहे." असं म्हणून प्रताप जावयास निघाला. तोच दुष्टबुद्धीने त्याचा हात धरला आणि तो म्हणाला,

"फर्फट् फर्फुट् सरसुट् हो
आता बेटा, ससा हो."

त्याबरोबर प्रताप ससा झाला आणि उड्या मारीत मारीत अरण्यात निघून गेला. त्या अरण्यात त्याला कोणताच पशु किंवा

पक्षी आढळला नाही. त्याच्या ओरडण्याने त्या अरण्यात भटकणारे शिकारी जागे झाले. त्यांनी सशाला पकडण्याचा प्रयत्न केला. पण धूर्त सशाने त्यांना दाद दिली नाही. अशा रीतीने कंटाळलेल्या स्थितीत एक वर्ष घालवल्यानंतर दुष्टबुद्धीने त्याला आपल्या जादूच्या साह्याने बोलावून घेतले. तो समोर आल्यावर दुष्टबुद्धी म्हणाला,

" फर्फुट्, फर्फुट् सर्सुट् हो
आता बेटा मुलगा हो "

त्याबरोबर एका क्षणात सशाचा पुन्हा प्रताप झाला. दुष्टबुद्धी हंसत म्हणाला, " तू सुरक्षित परत आलेला पाहून मला फार आनंद वाटतो. सशाचं जीवन तुला कसं काय वाटलं ? " " फार चांगलं वाटलं. पूर्वीपेक्षा आता मला खूप जोरात पळता येईल. आणि लांब उड्या मारता येतील असं मला वाटतं. " प्रताप म्हणाला. " आणखी एक वर्ष माझ्यापाशी राहण्याची तुझी इच्छा आहे कां ? " दुष्टबुद्धीने प्रतापला विचारले. " होय, मला तुमचं काम आवडतं " प्रताप आनंदून म्हणाला. " ठीक आहे. " दुष्ट-बुद्धी म्हणाला. " तू नसल्यामुळे गोठ्यातील प्राण्यांना कोणीच खाऊ घातले नाही. भुकेने त्यांचा जीव व्याकुळ झाला असेल. तेव्हा तुझं पहिलं काम म्हणजे त्या सर्व प्राण्यांना पोटभर खाऊ घालणे. पण लक्षात ठेव, ते काम पूर्वीसारखंच चोवीस तासात झालं पाहिजे. " " ठीक आहे " असे म्हणून प्रताप गोठ्याकडे निघून गेला.

वर्षभर खावयास न मिळाल्यामुळे गोठ्यातील सर्व प्राणी भुकेने चेकाळून आरडाओरड करीत होते. प्रतापने आपले सामर्थ्य पणाला लावून त्या सर्व प्राण्यांना पोटभर खाऊ घातले. हे काम

करीत असतांना तो अतिशय दमून गेला. रात्रीच्या सुमारास सर्व काम संपवून तो दुष्टबुद्धी समोर उभा राहिला. त्याला पाहून दुष्टबुद्धी म्हणाला, "वा, तू तर ठरलेल्या वेळेपेक्षाही आधीच सर्व काम संपवून टाकलेस! छान! आता तू पोटभर जेव आणि निवांत झोप. उद्या सकाळी मला भेट."

दुसऱ्या दिवशी सकाळी प्रताप दुष्टबुद्धीकडे गेला. तेव्हा दुष्टबुद्धी त्याला म्हणाला, "तू काल फारच चांगलं काम केलं आहेस. तेव्हा आता तुला तुझ्या मर्जीप्रमाणे कुठेही जाण्यास परवानगी आहे." "ठीक आहे." असे म्हणून प्रताप जाण्यास निघाला तोच दुष्टबुद्धीने त्याच्या मानेला धरून म्हटले,

"फर्फुट, फर्फुट सर्सुट हो
आता बेटा, पोपट हो"

त्याबरोबर प्रतापचा पोपट झाला. आणि आपले पंख फडफडवीत अरण्याच्या दिशेने उडाला. प्रतापला वाटले, सशाच्या जीवनापेक्षा पोपटाचं जीवन जास्त बरं. आता मला निळ्या आकाशांत भराऱ्या मारता येतील. झाडावरची गोड फळं खावयास मिळतील आणि दूरदूरच्या प्रदेशात निवांतपणे भटकता येईल. सात आठ महिने त्याने अरण्यात मोठ्या मजेत काढले. पुढे कंटाळा आल्यामुळे तो अरण्याच्या बाहेरील प्रदेशात आला. पण दुर्दैवाने त्या ठिकाणी शिकारीच्या शोधार्थ भटकत असणाऱ्या शिकाऱ्यांची दृष्टी त्याच्याकडे गेली. जीव वाचविण्यासाठी तो पुन्हा अरण्याकडे उडाला. त्या ठिकाणी असलेल्या झाडावर लपून छपून तो दिवस काढू लागला. एक वर्ष संपल्यावर दुष्टबुद्धीने त्याला बोलावून घेतले. पोपट समोर आल्याबरोबर दुष्टबुद्धी म्हणाला,

"फर्फुट् फर्फुट् सर्सुट् हो
आता बेटा मुलगा हो"

त्याबरोबर पोपटाचे रूप नाहीसे होऊन प्रतापला स्वत:चे रूप प्राप्त झाले. दुष्टबुद्धी म्हणाला, "आता सुरक्षित परत आला आहेस. पोपटाचं आयुष्य तुला कसं काय वाटलं ?" प्रताप आनंदून म्हणाला, "सशाच्या जीवनापेक्षा फारच चांगलं वाटलं. निळ्या आकाशात उडता आलं. झाडावर राहता आलं. गोड गोड फळं खावयास मिळाली." थोड्या वेळाने दुष्टबुद्धी म्हणाला, "तुझ्या नोकरीची दोन वर्षे संपली, मोहोरांच्या दोन थैल्या घेऊन जाणार कां आणखी एक वर्ष नोकरी करणार ?" "पैसा कुणाला नको आहे ! आणखी एक वर्ष मी तुमच्याजवळ राहीन आणि तुमचं काम करीन." दुष्टबुद्धी हसत म्हणाला, "ठीक आहे, तुझ्या मर्जीप्रमाणे होऊ दे. आता गोठ्याकडे जा आणि भुकेने वखवखलेल्या सर्व प्राण्यांना पोटभर खाऊ घाल. पण लक्षात ठेव. ते काम चोवीस तासात झालं पाहिजे बर कां !"

"ठीक आहे" असे म्हणून प्रताप गोठ्याकडे गेला. गोठ्यात गेल्यावर त्याला फार आश्चर्य वाटले. कारण जास्त प्राण्यांची भरती झाल्यामुळे तो गोठा तीन मैल लांब व तीन मैल रुंद झाला होता. त्याला वाटलं आता येथील सर्व प्राण्यांना चोवीस तासात खाऊ घालणं मोठं कठीण काम आहे. पण त्याने एक क्षणही वाया न घालविता नेमून दिलेले आपले काम चोवीस तासात पुरे केले. तो दुष्टबुद्धीसमोर उभा राहिला. तेव्हा दुष्टबुद्धी त्याला म्हणाला, "तीन मैल लांब व तीन मैल रुंद असलेल्या गोठ्यातील सर्व प्राण्यांना तू चोवीस तासात कसं खाऊ घातलंस याचं मला मोठं आश्चर्य वाटतं. पण ते काम तू चांगल्या रीतीने

केलं आहेस तेव्हा तू आता पोटभर जेव आणि निवांत झोप घे. उद्या सकाळी तू मला टेकडीच्या पायथ्याशी भेट."

दुसऱ्या दिवशी सकाळी दुष्टबुद्धीने सांगितल्याप्रमाणे प्रतापने त्याची टेकडीच्या पायथ्याशी भेट घेतली, तेव्हा दुष्टबुद्धी म्हणाला, "तू काल खूप चांगलं काम केलं आहेस म्हणून तुला मी कुठेही जाण्यास परवानगी देत आहे. जेव्हा मला तुझी जरुरी भासेल तेव्हा मी तुला हाक मारीन." "ठीक आहे." असे म्हणून प्रताप जावयास निघाला तेव्हा दुष्टबुद्धीने त्याची मान पकडून म्हटले,

"फर्‌फुट, फर्‌फुट सर्‌सुट हो
आता बेटा मासा हो."

त्याबरोबर प्रतापचे रूपांतर माशात झाले. त्याने झटकन् टेकडीच्या पायथ्याजवळून वाहणाऱ्या एका छोटया नदीत उडी घेतली व पाण्याबरोबर तो वाहात चालला. प्रतापच्या मनात आले, "मासा झालो हे बरेच झाले. आता दिवस नि रात्र यथेच्छ पोहता येईल." काही अंतर पोहून गेल्यावर त्याला वाटले की आपणास पुष्कळ मासे भेटतील. त्यापैकी एखाद्या माशाशी आपण मैत्री करू. पण त्याला त्या पाण्यात एकही मासा किंवा दुसरा कोणताही प्राणी आढळून आला नाही. त्याला फार आश्चर्य वाटले. इतक्यात त्याच्या कानावर एक आरोळी पडली. त्याने पाहिले, दोन कोळी पाण्यात आपली जाळी टाकून आपल्याकडे पाहात आहेत. ताबडतोब त्याने नदीच्या खोल पाण्यात सुरकांडी मारली आणि मोठ्या कष्टाने त्यांची जाळी चुकवून तो पुढे निसटला. काही अंतरावर ती छोटी नदी समुद्राला मिळत होती. तेथपर्यंत पाण्याखालून प्रवास करीत तो जेव्हा अथांग समुद्रात

शिरला तेव्हा त्याने आपले डोके वर काढले. जिकडे तिकडे अफाट पाणीच पाणी पाहून त्याला फार गंमत वाटली. खूप वेळ पोहून कंटाळा आल्यानंतर समुद्राच्या तळाशी शोभा पाहण्याकरिता त्याने खोल बुडी घेतली. समुद्राच्या तळाशी असलेल्या प्रवाळांच्या टेकड्यांमधून जात असता त्याला दूर अंतरावर एक चमकणारा मनोरा दिसला. तिथे काय आहे ते पाहण्यासाठी तो जलद गतीने पोहत निघाला. आणि थोड्याच वेळात तो भव्य अशा ज़ाडजूड शिपल्यांनी बांधलेल्या एका किल्याच्या प्रवेशद्वाराशी आला. दार उघडे असल्यामुळे तो सरळ आत शिरला. शिंपल्याच्या किल्ल्याचा घाट पाहून त्याचे डोळे दिपले. शिंपल्यांनी बनविलेल्या लहान खोल्यांवर व खिडक्यांवर मोत्यांची व प्रवाळांची सुंदर नक्षी होती. खोल्यातून व बाहेर शेवाळाची चमकणारी हिरवळ अंथरलेली होती. खिडक्यावर व दरवाज्यावर समुद्रातील नाजुक वनस्पतीचे हिरवे जाळीदार पडदे लोंबत होते. समोरच्या प्रशस्त अंगणात लहान मोठ्या शिंपल्यांच्या कुंड्यातून चित्रविचित्र रंगांची फुलझाडे फुलांनी बहरलेली होती आणि त्यामध्ये असलेल्या पोवळ्याच्या कारंज्यातून मोत्यासारखे पांढरेशुभ्र पाणी थुईथुई उडत होते. हा कमालीचा सुंदर देखावा पाहून प्रतापला फार आनंद झाला आणि आश्चर्यही वाटले. एवढा सुंदर किल्ला कुणाचा आहे, इथं कोण रहात असावं, अशा प्रकारचे विचार त्याच्या मनात आले तोच एक अत्यंत सुंदर तरुणी एका खोलीतून हळूहळू बाहेर पडली. ती कारंज्याजवळ आली. थोडावेळ तिथे थांबून ती बहरलेल्या फुलझाडांची रंगीबेरंगी फुले तोडू लागली. तिच्या अंगावरील वस्त्रे इंद्रधनुष्याच्या रंगांची होती. तिचे सोनेरी लांबसडक केस पाठीवर रुळत होते. तिच्या डोक्यावर मोत्यांचा मुगुट होता.

या अनपेक्षित दृश्याने तर प्रताप आश्चर्याने स्तंभित झाला. त्याच्या मनांत विचार येऊ लागले, ही तरुणी कुणी जलदेवता असावी आणि हा अद्‌भुत किल्ला तिचाच असावा. पण एवढ्या मोठ्या किल्ल्यांत ही देवता एकटीच कशी ? तिच्या दासी कुठं गेल्या ? देवदेवता नेहमीच आनंदी असतात. त्यांची मुद्रा नेहमीच प्रसन्न असते असं म्हणतात. ही देवता असेल तर हिचा चेहरा एवढा दुःखी का ? तिला कसलं दुःख होत आहे ? मला माणसाचं रूप असलं असतं तर किती बरं झालं असतं ! मी तिला तिच्या दुःखाच कारण विचारले असते. ते तिचं दुःख नाहीसं करण्याचा प्रयत्न केला असता. त्याला वाटले, दुष्टबुद्धीने आपले रूप बदलण्यासाठी जे शब्द उच्चारले त्यांचा उच्चार आपण केला तर–पण ते शब्द त्याला लवकर आठवेनात. एकेक शब्द आठवण्याचा प्रयत्न करीत तो वेड्यासारखा किल्ल्याभोवती पोहत राहिला. बऱ्याच वेळानंतर जेव्हा संपूर्ण शब्द त्याला आठवले, तेव्हा तो किल्ल्यातील बागेत आला. फुले गोळा करून ती जलदेवता परत निघाली होती तोच प्रताप म्हणाला,

" फर्‌फुट, फर्‌फुट सर्‌फुट हो
आता बेटा मुलगा हो. "

त्याबरोबर माशाचे रूप नाहीसे होऊन प्रतापला स्वतःचं रूप प्राप्त झाले. त्या देवतेच्या समोर जाऊन तिला नमस्कार करून तो म्हणाला, " जलदेवते, " पण पुढील शब्द त्याच्या तोंडातून बाहेर पडले नाहीत. कारण ती सुंदर तरुणी एवढ्यांदा दचकली की तिचा तोल जाऊन ती खाली पडण्याच्या बेतात होती तोच तिने स्वतःला सावरले. जवळ फिरणाऱ्या माशापैकी एका माशाचा एकाएकी एक सुंदर तरुण कसा झाला याचे तिला अतिशय

आश्चर्य वाटले. हा अद्‌भुत प्रकार काय आहे हे कळून घेण्याच्या उद्देशाने धीर धरून तिने प्रतापला विचारले, "तुम्ही कोण ? आणि इथं कसं आलांत ?" प्रतापने आपले नाव सांगून सुरुवातीपासून आतापर्यंतची सर्व हकीकत तिला सांगितली. तेव्हा ती सुंदर तरुणी हसून म्हणाली, "आता माझी हकीकत ऐका. तुम्हाला वाटलं असेल, मी म्हणजे कुणी जलदेवता असेल. पण तसं काही नाही. माझं नांव सत्यवती. तुम्ही ज्याच्याकडे नोकरीला आहांत ते दुष्टबुद्धी म्हणजे माझे बाबा. त्यांनी मला आपल्यापासून इतकं दूर समुद्रात शिंपल्यांच्या किल्ल्यात का ठेवलं आहे असे तुम्हाला वाटत असेल, नाही का ? त्याचं कारण असं की, त्यांचं माझ्यावर फार प्रेम आहे. शिवाय मला कोणी त्यांच्यापासून घेऊन जाऊ नये हाही त्यांचा उद्देश आहे. माझे बाबा चांगले जादुगार आहेत ते तुम्हाला आता चांगलंच अनुभवाला आलं आहे. त्यांचीच सगळी करामत आहे." थोडे थांबून सत्यवती पुढे म्हणाली, "माझे बाबा जादुगार आहेत, पण चांगल्या कामासाठी ते आपल्या जादूचा उपयोग करीत नाहीत, कारण त्यांचा स्वभाव स्वार्थी व दुष्ट आहे. गोठ्यातील नानाप्रकारचे असंख्य पशुपक्षी पाहिले असतीलच. आपल्या जादूने त्यांची जशी केविलवाणी दशा करून टाकली आहे तशीच केविलवाणी दशा माझीही केली आहे. इथं मला कोंडून ठेवल्यापासून कितीतरी वर्षांनी आज मी माणूस पाहात आहे आणि त्याच्याशी बोलत आहे. या बंदिवासात असंच का एकाकी मला माझं सर्व जीवन घालवावं लागणार आहे ?" हे बोलत असताना सत्यवतीचा गळा दाटून आला.

प्रताप आश्चर्यचकित होऊन निश्चलतेने सत्यवतीची कथा ऐकत होता. तिच्या शेवटच्या उद्गाराने त्यालाही वाईट वाटले. तो म्हणाला, "सत्यवती, या बंदिवासातून तुझी सुटका होण्याचा काहीच मार्ग नाही का?" थोडावेळ विचार करून सत्यवती म्हणाली, "आहे. इथून माझी सुटका करण्याचा एकच मार्ग आहे. तुम्ही जर मनावर घेतलत् तर"--प्रताप अधीर होऊन म्हणाला, "सांग, सत्यवती, लवकर सांग, तुझी सुटका करण्यासाठी मी माझे प्राणही वेचीन."

"ऐका, तर मग" सत्यवती म्हणाली. "माझ्या बाबांच्या मालकीच्या प्रदेशाला लागून चंडवर्मा राजाचं राज्य आहे. त्याच्या चंद्रनगरात सोमदत्त नावाचा एक सरदार राहतो. त्या सरदाराने माझ्या बाबांकडून एक थैलीभर मोहोरा उसन्या घेतल्या आहेत. बाबा आता त्याच्याकडून मोहरांच्या तीन भरलेल्या थैल्या मागत आहेत. त्या त्याने एक महिन्याच्या अवधीत दिल्या नाहीत तर बिचाऱ्या सोमदत्ताला प्राणास मुकावे लागणार आहे. तुमच्या नोकरीची तीन वर्षे पुरी होण्याच्या बेतात आहेत ठरल्याप्रमाणे बाबांच्याकडून मोहोरांच्या तीन थैल्या तुम्ही घ्या आणि चंद्रनगरांत जाऊन सोमदत्ताकडे नोकरीला राहा. योग्य वेळ येताच सोमदत्त पैशाच्या अभावामुळे, आपणास प्राणास मुकावे लागणार म्हणून दुःखी कष्टी होईल त्यावेळी दुष्टबुद्धीकडे जाताना तुम्हालाही बरोबर नेलं पाहिजे या अटीवर तुम्ही सोमदत्तास तुमच्याजवळ असलेल्या मोहोरांच्या तीन थैल्या द्या. सोमदत्त मोठ्या खुशीनं तुम्हाला बरोबर घेऊन बाबांकडे जाईल. पण लक्षांत ठेवा.तुम्ही मात्र सोमदत्ताबरोबर जाताना वेड्याचं सोंग घेऊन जावयाचे आहे. तिथं गेल्यावर वाड्यातील सामानाची, खिडक्या दरवाज्यांची आदळ

आपट करून मोडतोड करा. त्यामुळे माझे बाबा फार रागावतील. ते सोमदत्तास म्हणतील, "तुझ्या वेडचा नोकरानं माझ्या सामानाची नासधूस केली आहे. तेव्हा नुकसान भरपाई म्हणून तू माझ्या तीन प्रश्नांची उत्तरे दे, नाहीतर मरायला तयार हो ! बाबांचा पहिला प्रश्न, "माझी मुलगी सत्यवती कोठे आहे?" हा असेल. अर्थात् सोमदत्ताला या प्रश्नाचं उत्तर देता येणार नाही. तेव्हा तुम्ही पुढे होऊन म्हणायचं, "फार दूरवर असलेल्या समुद्राच्या तळाशी असलेल्या शिपल्यांच्या किल्ल्यात." हे उत्तर बरोबर असल्यामुळे बाबा दुसरा प्रश्न विचारतील, "तू जर सत्यवतीला पाहिलंस तर तिला तू ओळखशील काय ?" तेव्हा तुम्ही म्हणा की माझे डोळे गच्च बांधलेले असले तरी काळोखातसुद्धा मी तिला ओळखीन ! तुमचं हे उत्तर ऐकल्याबरोबर बाबा तुमच्यासमोर माझ्यासारख्याच हजार सत्यवती निर्माण करतील. त्या हजार सत्यवतीतून खरी सत्यवती तुम्ही ओळखू शकणार नाही. पण तुमच्या समोरून जातांना मी हळूच तुमच्या हाताला स्पर्श करीन त्यावेळी चटकन् तुम्ही माझा हात धरा आणि म्हणा, "ही पहा तुमची मुलगी सत्यवती !" तुम्ही मला नेमकं हुडकून काढलंत म्हणून बाबा फार रागावतील. आणि गर्जना करीत तिसरा प्रश्न विचारतील, "मला जादू शिकविणारा माझा गुरु कोण? त्याला तू ओळखशील काय ?" तेव्हा तुम्ही म्हणा, "तुमचा गुरु एक पोपट आहे, त्याला मी ओळखीन." तेव्हा बाबा तुमच्या समोर हजार पोपट निर्माण करतील. बाबा ज्याचे शिष्य आहेत त्या पोपटाच्या चोचीचा पुढचा भाग पांढरा शुभ्र आहे. हा पोपट तुमच्या समोरून जाऊ लागला की, चटकन त्याला पकडून त्याची मान मुरगाळून टाका. त्याचक्षणी बाबांजवळ

असलेली जादू नाहीशी होईल. मग आपण सांगू त्याप्रमाणे ते वागतील. एवढं बोलून सत्यवती थांबली.

" सत्यवती, फारच चतुर आणि शहाणी आहेस तूं " प्रताप म्हणाला.

" छे, तुम्हीच माझ्यापेक्षा चतुर आहांत. मी तुमच्यावर सोपविलेली कामगिरी तुम्ही चांगल्या तऱ्हेने पार पाडणार अशी माझी खात्री आहे. आता वेळ न लावता तुम्ही पुन्हा माशाचं रूप घ्या. तुम्हांला बाबांचं आमंत्रण येण्याची वेळ झाली," सत्यवती म्हणाली.

" ठीक आहे, तू सांगशील तसे करतो. काही काळजी करू नकोस." असे म्हणून प्रतापने माशाचे रूप धारण केले आणि तो दूर समुद्रात निघून गेला.

काही तासांनी टेकडीच्या पायथ्याशी येण्याचे दुष्टबुद्धीचे आमंत्रण प्रतापला मिळाले. दुष्टबुद्धी टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या नदीच्या काठावर उभा होता. मासा दिसल्याबरोबर तो म्हणाला,

" फर्फुट फर्फुट सर्फुट हो
आता बेटा मुलगा हो. "

त्याबरोबर प्रतापला स्वतःचे रूप प्राप्त झाले. दुष्टबुद्धी म्हणाला, " आतां तू सुरक्षित परत आला आहेस. माशाचं जीवन तुला कसं काय वाटलं ते सांग." प्रताप म्हणाला, " फारच छान ! त्यामुळे समुद्रातील कितीतरी रमणीय गोष्टी मला पाहता आल्या." थोड्या वेळाने दुष्टबुद्धी हसून म्हणाला, " मग आणखी एक वर्ष माझ्याकडे नोकरी करण्यास तुला आनंदच वाटेल, नाही का ?" " महाराज, " प्रताप म्हणाला, " तुमच्या पदरी तीन वर्षे नोकरी

करण्याची मला संधी मिळाली याचा मला फार आनंद वाटतो. मला अजून नशिबाची परीक्षा पाहत बराच प्रवास करावयाचा आहे. तेव्हा ठरल्याप्रमाणे माझ्या नोकरीचा मेहनताना म्हणून मोहोरांच्या तीन थैल्या मला द्या. आणि कृपा करून पुढच्या प्रवासाला जाण्याची मला परवानगी द्या." दुष्टबुद्धीने त्याला राहण्याचा आग्रह केला नाही. मोहोरांच्या तीन थैल्या देऊन त्याने प्रतापला निरोप दिला.

प्रताप प्रवास करीत काही दिवसांनी चंद्रनगर जवळ येऊन पोहोचला. नगरात प्रवेश करण्यापूर्वी एका मोठ्या आंब्याच्या झाडाखाली खड्डा खणून त्यात मोहरांच्या तीन थैल्या ठेवून त्याने तो खड्डा बुजवून टाकला. चंद्रनगरात प्रवेश केल्यावर वेशीतून बाहेर पडणाऱ्या पहिल्याच माणसाला त्याने सोमदत्ताच्या घराचा पत्ता विचारला. प्रतापच्या सुदैवाने तो माणूस म्हणजे सोमदत्तच निघाला. त्याने प्रतापला विचारले, "काय काम आहे तुमचं सोमदत्ताकडं ? मीच तो सोमदत्त." प्रताप त्याला नमस्कार करून म्हणाला, "आपणास एका नोकराची जरूरी आहे असं ऐकलं. तेव्हां आपण जर मला नोकरी दिली तर माझ्यावर फार उपकार होतील. आपलं कोणतेही काम मी प्रामाणिकपणानं आणि मन लावून करीन." प्रतापचे कमावलेले शरीर आणि प्रसन्न मुद्रा पाहून सोमदत्ताला त्याच्याविषयी आपुलकी वाटू लागली. तो म्हणाला, "माझं एक कापडाचं दुकान आहे. तेथे तू काम करशील ?" "हो, मला ते काम आवडेल," प्रताप चट्कन म्हणाला.

"पण माझी सांपत्तिक स्थिती सध्या तितकीशी ठीक नसल्याने मला तुला नियमितपणे पगार देणे परवडणार नाही. आधीच स्पष्ट सांगितलेलं बरं, नाही कां ?" "त्याची तुम्ही नका

काळजी करूं. मला पगार दिला नाही तरी चालेल. फक्त माझी जेवण्याची व राहण्याची व्यवस्था करा म्हणजे झालं."

त्याप्रमाणे सोमदत्ताने प्रतापला आपल्या कापड दुकानीं नोकरी दिली आणि त्याच्या राहण्या जेवण्याची सोय त्याने स्वत:च्या घरात केली.

दिवसामागून दिवस जाऊ लागले. सोमदत्त उदास व कष्टी दिसू लागला. ही गोष्ट प्रतापच्या नजरेस आली. एक दिवस रात्रीचे जेवण झाल्यावर प्रताप सोमदत्ताला म्हणाला, "महाराज, तुम्ही कसल्यातरी मोठ्या काळजीत असल्यासारखं दिसत आहा. तुमच्या चितेचं कारण मला सांगा. मी ती निवारण करण्याचा प्रयत्न करीन." सोमदत्त एक दीर्घ उसासा टाकीत म्हणाला, "काय सांगू, मोठी कठीण वेळ आली आहे. माझ्या प्राणावरच बेतलं आहे. तुझ्याकडून माझं दु:ख निवारण होवो अगर न होवो पण ते तुला सांगावंच असं मला वाटतं. तू माझा नोकर असला तरी मी तुला माझा मित्र समजतो. माझी हकीकत ऐक आणि मला योग्य तो सल्ला दे. दुष्टबुद्धी नावाच्या एका जादूगाराकडून मी एक मोहोरांची थैली उसनी घेतली होती. त्या गोष्टीला तीन वर्षे होऊन गेली. आता तो मोहोरांनी भरलेल्या तीन थैल्या मागत आहे. त्यासाठी त्याने मला एक महिन्याची मुदत दिली. ही मुदत उद्या सूर्यास्ताला संपणार आहे. त्याच्या आधी मोहोरांच्या तीन थैल्या नेऊन त्याला दिल्या नाहीत तर मला माझे प्राण गमवावे लागणार आहेत. मित्रा, आता सांग, काय करू मी ?"

प्रताप म्हणाला, "सोमदत्त, तुम्ही निश्चित रहा. तुमचं संकट दूर करण्याची जबाबदारी मी घेतो. तुम्हास जेवढ्या रकमेची जरूरी आहे तेवढी रकम माझ्याजवळ आहे. मी ती

तुम्हास उसनी देतो. फक्त मला तुमच्या बरोबर वेड्याचं सोंग घेऊन येण्याची परवानगी द्या. तेथे मी वेड्यासारखं जे काही करीन त्याबद्दल तुम्हाला किंवा मला काहीच अपाय होणार नाही. ही खात्री बाळगा." प्रतापचे बोलणे ऐकून सोमदत्ताला फार आनंद झाला. आपल्या प्राणावरचे संकट नाहीसे करण्यासाठी परमेश्वरच प्रतापच्या रूपाने धावून आला असे त्याला वाटले.

दुसऱ्या दिवशी अगदी पहाटे सोमदत्त व प्रताप दुष्टबुद्धीकडे जाण्याकरता चंद्रनगरच्या बाहेर पडले. मोठ्या आंब्याच्या झाडाजवळ आल्यावर त्या ठिकाणी दडवून ठेवलेल्या मोहरांच्या तीन थैल्या प्रतापने बाहेर काढल्या आणि त्याने त्या सोमदत्ताच्या स्वाधीन केल्या. वेगाने प्रवास करीत ते दोघेही सूर्यास्ताच्या बराच वेळ आधी दुष्टबुद्धीच्या वाड्याजवळ येऊन पोहोचले. तेव्हा वेड्याचे हुबेहुब सोंग घेतलेला प्रताप पुढे झाला. त्याने दुष्टबुद्धीच्या वाड्याचे दरवाजे, खिडक्या यांची आदळ आपट सुरू केली. इतरही सामान त्याच्या कचाट्यातून सुटले नाही. प्रतापच्या मागून सोमदत्त येत होता. सामानाच्या मोडतोडीच्या मोठ्या आवाजाने रागावलेला दुष्टबुद्धी एकदम बाहेर आला. प्रथम सोमदत्त त्याच्या नजरेस पडला. तेव्हा दुष्टबुद्धी ओरडून म्हणाला, "कोण सोमदत्त ! आणि माझ्या सामानाची मोडतोड करणारा तो मूर्ख तुझा नोकर ! पूर्वी उसनी घेतलेल्या रकमेची तू अद्याप फेड केली नाहीस. आणि आता मोडतोडीमुळे झालेल्या माझ्या नुकसानीची भरपाई तुझ्याकडून कशी होणार ? त्यासाठी तुला आपल्या प्राणाचे मोल निश्चितच द्यावे लागणार आहे."

"ही घ्या, तुमची दाम तिपटीने तुम्ही मागितलेली रकम", असे शांतपणे म्हणत सोमदत्ताने एकामागून एक अशा मोहोरांच्या

तीन थैल्या दुष्टबुद्धीपुढे ठेवल्या. आश्चर्यचकित झालेल्या दुष्टबुद्धीने ती सगळी रक्कम मोजून घेतली आणि गुरगुरत तो म्हणाला, " माझ्या मौल्यवान् सामानाची तुझ्या नोकराने जी मोडतोड केली आहे, त्यामुळं झालेलं माझं नुकसान पैशानं भरून निघणार नाही. फक्त तुझ्या प्राणानेच त्याची भरपाई होईल. नाहीतर मी विचारणाऱ्या तीन प्रश्नांची तू बरोबर उत्तरे दे."

" मोठ्या आनंदानं, सोमदत्त तसा प्रयत्न करतील." वेड्याचं सोंग घेतलेला प्रताप म्हणाला, " मी ही त्यांना मदत करीन."

" तुम्ही दोघंही माझ्या प्रश्नांचं उत्तर देऊ शकणार नाहीत." असे म्हणून दुष्टबुद्धी खदखदा हसला. आणि त्याने पहिला प्रश्न केला, " माझी सुंदर मुलगी सत्यवती कोठे राहते?" " फार दूरवर असलेल्या समुद्राच्या तळाशी, शिंपल्यांच्या किल्ल्यात," प्रतापने उत्तर दिले.

" जर ती तुझ्या दृष्टीस पडली असेल, तर आता तिला तू ओळखू शकशील?" दुष्टबुद्धीने दुसरा प्रश्न विचारला. " होय. अगदी नक्कीच. माझे डोळे घट्ट बांधले तरी काळोखात सुद्धा मी तिला ओळखीन. येऊ द्या तिला माझ्यासमोर," प्रताप हसत म्हणाला.

" ती पहा आली सत्यवती." असे म्हणून दुष्टबुद्धीने आपला उजवा हात वर उचलला. त्याबरोबर सर्व दिवाणखाना सत्यवती सारख्याच सुंदर तरुणींनी भरून गेला. त्यातून खरी सत्यवती कोणती ते शोधून काढणे अशक्यच होते. त्या एकामागून एक प्रताप समोरून जाऊ लागल्या. प्रताप त्यांच्याकडे पाहात निश्चल उभा होता. जेव्हा एका तरुणीने त्याच्या समोरून जाताना हळूच त्याच्या

हाताला स्पर्श केला तेव्हा चटकन् प्रतापने तिचा हात धरला आणि दुष्टबुद्धीकडे वळून तो म्हणाला, "महाराज, ही पहा तुमची मुलगी सत्यवती!" सोमदत्ताच्या वेडया नोकराने सत्यवतीला अचूक ओळखले या त्याच्या शहाणपणाचा दुष्टबुद्धीला फार राग येऊन तो एकदम किंचाळला. त्याबरोबर खऱ्या सत्यवतीखेरीज इतर सर्व तरुणी एकदम अदृश्य झाल्या.

थोडया वेळाने प्रताप दुष्टबुद्धीला म्हणाला, "आता विचारा तुमचा तिसरा आणि अखेरचा प्रश्न."

"माझा तिसरा प्रश्न सर्वात अवघड असा आहे तू कितीही प्रयत्न केलास तरी तुला त्याचे उत्तर सापडणार नाही. मला जादू शिकविणारा माझा गुरु कोण आहे? त्याला तू ओळखशील काय?" गुरगुरतच दुष्टबुद्धी म्हणाला.

"हा तर सर्वात सोपा प्रश्न," प्रताप आनंदाने उडी मारीत म्हणाला, "तुमचा गुरु एक पोपट आहे. त्याला मी खचितच ओळखीन, अगदी काळोखात सुद्धा."

दुष्टबुद्धीने आपला डावा हात अर्धवर्तुळाकार फिरविला. त्याबरोबर तो दिवाणखाना असंख्य पोपटांनी आणि त्यांच्या किलबिलाटाने भरून गेला. खरा पोपट ओळखून काढण्याची सत्यवतीने सांगितलेली खूण प्रतापला चटकन् आठवेना. म्हणून तो चांगलाच गोंधळून गेला. त्याने सत्यवतीकडे पाहिले. ती एकटक नजरेने खिडकीकडे पाहात होती. प्रतापनेही आपली दृष्टी तिकडे वळविली. आकाशांतून एक पांढरा ढग संथपणे तरंगत चालला होता. त्याच क्षणी सत्यवतीने सांगितलेली खूण प्रतापला आठवली. ज्याच्या चोंचीचा पुढचा भाग पांढरा आहे असा पोपट दिसताच प्रतापने त्याच्यावर झडप घातली. आणि त्याची मान मुरगाळून

त्याने त्या पोपटाला खिडकीबाहेर फेकून दिले. त्याचवेळी दुष्टबुद्धीच्या तोंडून एक मोठा सुस्कारा बाहेर पडला. प्रताप, सोमदत्त आणि सत्यवती आश्चर्याने स्तंभित होऊन त्याच्याकडे पाहू लागले. अंवती भवती असलेला असंख्य पोपटांचा थवा केव्हाच नाहीसा झाला होता. दुष्टबुद्धीची मुद्रा म्लान झाली होती. त्याचा ताठा नाहीसा झाला होता. स्वत:शी बोलत असल्याप्रमाणे तो म्हणाला, ' बरं झालं, भयंकर शापातून मी आता मुक्त झालो. आता माणूस म्हणून जगणं आणि दुसऱ्याला जगवणं मला शक्य झालं." आणि सत्यवतीचा हात धरून तो प्रताप आणि सोमदत्त यांच्याकडे वळून म्हणाला, " चला, एक क्षणभरही येथे थांबू नका. ताबडतोब बाहेर पडा." सर्वजण धावतच गुहेबाहेर पडले. ते मोकळ्या प्रदेशात येतांच कडाड् काड् असा मोठा कानठळ्या बसविणारा आवाज झाला. टेकडी दुभंगली. दुष्टबुद्धीचा वाडा पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळला. गोठा उध्वस्त झाल्यामुळे मोकळे झालेले सर्व प्रकारचे प्राणी जिवाच्या भीतीने ताड्ताड् उड्या मारीत अरण्याच्या दिशेने धावत सुटले. त्यांच्याकडे मोठ्या आनंदाने पाहात दुष्टबुद्धी म्हणाला, " जादूच्या आसुरी सामर्थ्यापासून आता माझी सुटका झाल्यामुळं स्वतंत्र राहण्यात केवढा आनंद असतो याची मला कल्पना आली." नंतर प्रताप व सत्यवती यांच्याकडे वळून तो म्हणाला, " यापुढं तुम्ही सांगाल तसं मी वागणार आहे, तुम्ही न्याल तिकडे येणार आहे." सोमदत्त म्हणाला, " चला, आपण सर्वजण चंद्रनगराकडे जाऊं. माझ्या घरी आपण सर्वांनी काही दिवस पाहुणचार घ्यावा अशी माझी इच्छा आहे." त्याप्रमाणे सर्वजण चंद्रनगराकडे निघाले. वाटेत दुष्टबुद्धी म्हणाला, " माझं नांवच आता दुष्टबुद्धी असं राहिलं आहे. तेव्हा

तुम्ही सर्वांनी मला सुष्टबुद्धी असं म्हणा म्हणजे तेच माझं नांव रूढ होईल." हे ऐकून सर्वांना आनंद झाला.

चंद्रनगरात आल्यावर काही दिवसांनी सोमदत्त, सुष्टबुद्धी व प्रताप यांना बरोबर घेऊन चंडवर्मा राजाकडे गेला. प्रतापचे सुदृढ शरीर व देखणी मुद्रा पाहून राजाने त्याला आपला अंगरक्षक म्हणून नेमून घेतले. आणि कोठीची व्यवस्था पाहण्याच्या कामावर सुष्टबुद्धीची नेमणूक केली.

चंद्रनगरात एक छोटे टुमदार घर विकत घेऊन सुष्टबुद्धी, प्रताप व सत्यवतीसह तेथे राहू लागला. एका चांगल्या मुहूर्तावर सुष्टबुद्धीने प्रताप व सत्यवती यांचा विवाह समारंभ मोठ्या थाटांत साजरा केला. तेव्हा प्रतात सुष्टबुद्धी व सत्यवती यांना हसत म्हणाला, "मी माझ्या नशिबाची परीक्षा पाहण्यास निघालो होतो पण नशिबानेच माझी परीक्षा घेतली. आणि उत्कृष्ट रीतीने उत्तीर्ण झाल्याबद्दल मला सुंदर व चांगले बक्षीसही दिले."



# दीनपालाची कहाणी

चंद्रनगरात धनपाल व दीनपाल नावाचे दोन भाऊ राहात होते. धनपाल खूप श्रीमंत होता. त्याची बरीच शेतीवाडी होती. शिवाय व्यापारातही त्याने खूप पैसा कमावला होता. एखाद्या राजवाड्यासारखे त्याचे मोठे घर होते. घरात नोकरचाकर होते. दारात घोडागाडी होती. धनपाल, त्याची बायको धनवती व त्याची मुलेबाळे यांच्या अंगावर नेहमीच उंची वस्त्रे असत. धनवती तर नानाप्रकारच्या दागदागिन्यांनी सजलेली

असे. धनपालाच्या अगदी उलट दीनपालाची परिस्थिती होती. त्याने व्यापारात घातलेला पैसा बुडल्याने त्याला गरीबी आली होती. भाड्याच्या एका साध्या घरात आपली बायको दीनवती व मुलेबाळे यांच्यासह तो राहात होता. घरातले दागदागिने व थोडाबहुत पैसा ही दोन्हीही सावकाराची देणी देण्यात नाहीशी झाली होती. गरिबीमुळे केव्हा केव्हा दुपारच्या जेवणाचीही सर्वांना भ्रांत पडे. कसलीही नोकरी करण्याची दीनपालाची तयारी होती. पण त्याला कुठेही नोकरी मिळेना. त्याला वाटले, " जवळ पैसा असला म्हणजे सगळे गोड असतात. जवळ पैसा नसला की जवळचा दूरचा प्रत्येकजण पाठ फिरवतो. पाहून न पाहिल्यासारखे करतो. अशा माणसापुढे कधीही न पसरलेला हात पसरून काय मिळणार ? उलट अपमानच होणार. " केव्हां केव्हां दीनपाल आपल्या थोरल्या भावाकडे जाई. धनपालाला आपल्या धाकटचा भावाला मदत करावीशी वाटे. पण धनवती मोठी कजाग असल्याने ती तसे त्याला करू देत नसे. तिला वाटे दीनपालाला दिलेला पैसा परत येणार नाही. शिवाय एकदा त्याला पैसे दिले तर तो नेहमीच येऊन पैशासाठी धरणे धरून बसेल. असे होऊ लागले की आपल्या जवळचा पैसा कमी होईल. अशा विचारांची होती स्वार्थी धनवती !

एके दिवशी आपल्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त धनपालाने नगरातील व्यापाऱ्यांना व प्रतिष्ठित लोकांना मेजवानी दिली. दीनपालाला त्या मेजवानीचे आमंत्रण आलेले नव्हतेच. दीनपाल व दीनवती दोघेही स्वाभिमानी असल्याने आमंत्रण नसतांना मेजवानीला जाण्याचा विचार त्यांच्या मनांत आलाच नाही. त्यादिवशी दीनपालाच्या घरी धान्याचा कणही नव्हता. मुलेबाळे भुकेने

व्याकुळ झाली. दीनवतीने शेजाऱ्यापाजाऱ्याकडून पसा पसा धान्य आणले. त्या दिवसापुरता तरी अन्नाचा प्रशन मिटला. दीनपालाने मनाशी ठरविले की आज रात्री धनपालाच्या शेतात जाऊन तेथील भरदार जोंधळ्याची कणसे तोडून आणायची. असे करणे म्हणजे चोरी करणे नव्हे. तो माझा भाऊच आहे. त्याला मागितलं तर तो देत नाही. मग अशा प्रकारे घेतले तर त्यात काय पाप आहे?

रात्री एक मोठे पोते घेऊन दीनपाल धनपालाच्या शेतात गेला. त्याने एका मोठ्या कणसाला तोडण्यासाठी हात लावताच त्याचा हात दुसऱ्या एका बलिष्ट हाताने पकडला गेला. दीन-पालाला वाटले धनपालाने शेताची राखण करण्यासाठी ठेवलेला कोणी एक रखवालदार असावा. पण अंधारात दीनपालाला तो रखवालदार दिसत नव्हता, की त्याचा हातही नव्हता. फक्त आपला हात कोणीतरी पकडला आहे एवढेच त्याला जाणवत होते. अगदीच जवळच कोणीतरी त्याला म्हणाले, "ही कणसे तोडू नकोस, तसा तुला अधिकार नाही." दीनपाल ओरडून म्हणाला, "तू कोण आहेस? माझा हात पकडण्याचा तुला काय अधिकार आहे? मी माझ्या भावाच्या शेतातीलच कणसे तोड-ण्यासाठी आलो आहे." "अरे, मी तुझ्या भावाचं दैव आहे," तो आवाज म्हणाला, "मी त्याचं शेत राखत आहे. तुला या शेतातला एकही दाणा नेऊ देणार नाही. चल जा येथून."

"माझ्या भावाचं दैव!" दीनपाल आश्चर्याने म्हणाला, "अरे, तू मला मदत का करीत नाहीस? माझी मुलेबाळे भुकेने व्याकुळ झाली आहेत. थोडी कणसे दिलीस तर देव तुझे कल्याण करील." दीनपालाला हसण्याचा आवाज ऐकू आला. त्याच्या

पाठोपाठ शब्द आले. " किती मूर्ख आहेस तू ! अरे, मी तुझं दैव नाही. तुझ्या भावाचं दैव आहे. तुझं दैव साता समुद्रापलीकडे घोरत गाढ झोपलं आहे. तुझ्या अंगात हिंमत असेल तर जा आणि झोपलेल्या त्या तुझ्या दैवाला जागे कर."

दीनपाल मुकाटद्याने रिकाम्या हाताने घरी परत आला. घडलेली सर्व हकीकत त्याने दीनवतीला सांगितली व साता समुद्रापलीकडे झोपलेल्या आपल्या दैवास जागे करण्यासाठी जाण्याचा निश्चयही त्याने तिच्याजवळ बोलून दाखविला.

दुसऱ्या दिवशी दीनवतीने शेजाऱ्याकडून उसने पीठ आणून त्याच्या दशम्या केल्या. त्याच्या चळतीवर लोणचे ठेवून तिने एक छोटे गाठोडे तयार केले. ते घेऊन दीनपाल प्रवासाला निघाला. प्रवास करीत असता एके दिवशी दशमी खाण्यासाठी तो एका जांभळाच्या झाडाखाली बसला. पिकलेल्या जांभळांनी ते झाड भरगच्च झाले होते. वाऱ्याच्या झोताने काही जांभळे खाली पडली. ती दीनपालाने गोळा केली. एक जांभूळ त्याने तोंडात टाकले. पण त्याचे तोंड गोड होण्याऐवजी कडू झाले. त्याने ते जांभूळ थुंकून टाकले आणि हातातली सर्व जांभळे दूर फेकून दिली. त्याक्षणी ते झाड बोलू लागले. ते म्हणाले, " बाबा, कोण आहेस तू ? कुठे निघाला आहेस ? " दीनपाल आपले तोंड कडू केले म्हणून त्या झाडावर फार रागावला होता. म्हणून तो गप्प बसला. त्याने काहीच उत्तर दिले नाही. पुन्हा झाडाने तेच प्रश्न विचारले. तेव्हा दीनपालाने त्या जांभळाच्या झाडाला आपली सारी कथा ऐकविली. तेव्हा ते झाड विनवणीच्या स्वरात म्हणाले, " तुझ्या दैवाची आणि तुझी भेट झाली तर कृपा करून त्याला माझ्या बाबतीत असं विचार की, माझी सर्व फळे

कडू कां असतात ? त्यामुळे माणसे मला शिव्या देतात. आणि पक्षी माझ्या आसपासही फिरकत नाहीत."

"ठीक आहे. तसं विचारतो." असे त्या जांभळाच्या झाडाला आश्वासन देऊन दीनपाल पुढे निघाला. काही दिवसांनी दीनपाल झऱ्याच्या काठाने प्रवास करीत असतांना त्याला असे आढळून आले की, त्या झऱ्याचे वाहते पाणी काठावर असलेल्या बाभळीच्या पायाशी गरगर फिरून पुन्हा मागे जात होते. पाणी पिण्यासाठी दीनपाल थांबला. तेव्हा झरा त्याला म्हणाला, "बाबा तू कोण आहेस ? आणि कुठं निघाला आहेस ?" दीनपालाने त्याला आपली सर्व कहाणी सांगितली. तेव्हा तो झरा म्हणाला, "तुझ्या दैवाची आणि तुझी भेट झाली तर कृपा करून त्याला विचार की, माझे वाहते पाणी पुढे न जाता बाभळीच्या पायाशी घोटाळून परत का फिरते ?" "ठीक आहे. तसं विचारतो." असे म्हणून दीनपाल पुढे चालू लागला.

काही महिन्यांनी दीनपाल एका नगरात पोहोचला. नगर पाहण्याच्या उद्देशाने दीनपाल फिरू लागला. तेव्हा एका मध्यवर्ती चौकात अर्धवट बांधकाम झालेल्या एका विजयस्तंभाजवळ त्या नगराचा राजा डोक्याला हात लावून बसलेला त्याला दिसला. दीनपालाने जवळपासच्या लोकांना विचारले, "तुमचा राजा इथं कां खिन्नपणे डोक्याला हात लावून बसला आहे ?" एक जण म्हणाला, "काय करील बिचारा. मोठ्या हौसेने तो विजय-स्तंभ बांधीत आहे. पण तो पूर्ण होत आला की, धाडकन् खाली कोसळतो." इतक्यात राजाची दृष्टी दीनपालाकडे गेली. हा कोणी परदेशी प्रवासी आहे हे पाहून त्याने दीनपालाला जवळ बोलावून विचारले, "बाबा, तू कोण आहेस ?" तेव्हा दीनपालाने त्याला

आपली कर्मकथा सांगितली. ती ऐकून राजा म्हणाला, "बाबा, माझ्यावर एक कृपा कर. तुझ्या दैवाला विचार की, हा विजय-स्तंभ पूर्ण होत आला की पुन्हा पुन्हा खाली का कोसळतो ?"
"ठीक आहे. तसं विचारतो," असे राजाला आश्वासन देऊन दीनपाल पुढील प्रवासाला निघाला.

दीनपाल काही मैल चालून गेला नाही तोच त्याला एक मोठे मैदान लागले. त्या मैदानात असलेल्या एका झाडाखाली खोगीर घालून सज्ज असलेला एक उमदा घोडा त्याला दिसला. जवळपास कोणाही माणसाचा पत्ता नव्हता. घोड्याने दीनपालाला तू कोण कोठे निघाला आहेस वगैरे प्रश्न विचारले तेव्हा दीन-पालाने त्यालाही आपली कर्मकथा सांगितली. तेव्हा घोडा त्याला म्हणाला, "तुझ्या दैवाला कृपा करून एवढे विचार की माझ्यासारख्या चांगल्या उमद्या घोड्यावर बसायला कोणीच कसे तयार होत नाही ? कोणाची तरी सेवा करावी असं मला मना-तून फार वाटतं, मग माझ्याकरिता एवढं विचारशील ना ?"

"ठीक आहे, माझ्या दैवाला तसं विचारतो," असे म्हणून दीनपाल मार्गस्थ झाला.

काही दिवसाच्या प्रवासानंतर दमलेला दीनपाल एका डोंगराच्या कड्याजवळ आला. त्याला चिकटून एक मोठे झाड उभे होते. त्या झाडाच्या सावलीत दीनपाल विश्रांती घेण्याकरिता बसला. इतक्यात त्याला पक्षाच्या पिलांचा करुण आवाज त्याच्या कानी आला. त्याने वरच्या बाजूस पाहिले. एक भला मोठा अजगर गरुडाच्या घरट्याकडे सरकत होता. त्याला पाहूनच घर-ट्यांतील गरुडाची पिले केविलवाणे ओरडत होती. दीनपाल सरसर झाडावर चढला आणि घरट्यात शिरण्याच्या बेतात

असलेल्या त्या अजगराची त्याने आपल्या हातातील तलवारीने खांडोळी केली. दीनपाल झाडावरून खाली उतरला आणि विश्रांतीसाठी त्याने झाडाखाली अंग टाकताच त्याला झोप लागली.

गरुडपक्षी आपल्या घरट्यात परत येताच घडलेली सर्व हकीकत पिलांनी त्याला सांगितली व आपला प्राणदाता झाडाखाली झोपला आहे हेही सांगितले. तेव्हा गरुडपक्षी भरारी घेऊन खाली उतरला आणि दीनपाल जागा होण्याची वाट पहात तो त्याच्या पायाशी बसला. दीनपाल झोपेतून जागा झाल्याबरोबर त्याची दृष्टी गरुडाकडे गेली. त्याबरोबर तो ताड्कन् उठून बसला. गरुड त्याला म्हणाला, " भिऊ नकोस. तूं माझ्या पिलांना मोठ्या प्राणसंकटातून वाचवले आहेस त्यामुळे तुझे माझ्यावर फार उपकार झाले आहेत. तूं कोण आहेस आणि तुला कोठे जायचं आहे ?" दीनपालाने सुरवातीपासूनची सर्व हकीकत गरुडाला सांगितली. ती ऐकून गरुड म्हणाला, "तुझे उपकार फेडण्याची नामी संधी मला मिळाली आहे. तूं माझ्या पाठीवर बैस. मी तुला सातासमुद्रापलीकडे झोपलेल्या तुझ्या दैवाकडे घेऊन जातो." हे गरुडाचे बोलणे ऐकून दीनपालाला फार आनंद झाला. तो चटकन् गरुडाच्या पाठीवर बसला. वाऱ्याच्या गतीने भरारी मारणाऱ्या त्या गरुडाने सात समुद्र पार करून दीनपालाला त्याच्या दैवाजवळ नेऊन उतरविले. दीनपालाने पाहिले, आपले दैव तोंडावर चादर ओढून गाढ झोपलेले आहे. त्याने त्याच्याजवळ जाऊन त्याला जागे करण्याचा खूप प्रयत्न केला पण ते जागे झाले नाही. तेव्हा दीनपालाला फार राग आला. त्याने त्याच्या पायाचा अंगठा जोराने पिरगाळला. तेव्हा त्याचे दैव आरडा ओरडा करीत उठून बसले. गरीब पण साहसी दीनपाल

रागारागाने त्याला म्हणाला, " साता समुद्रापलीकडे इथं आरामात झोपून तूं मला किती कष्ट दिले आहेस याची तुला जाणीव नाही का ? ऊठ, झोपू नकोस. म्हणजे मला थोडीतरी विश्रांती तरी मिळेल. आणि लक्षात ठेव. यापुढं कधीही झोपणार नाही असं मला वचन दे." हे दीनपालाचे बोलणे ऐकून त्याचे दैव म्हणाले, " मी निवांत झोपी जाण्याचं कारण म्हणजे तू स्वतःच आहेस. तू आपल्या उद्योगानं मला कधीही जागे ठेवण्याचे यत्न केले नाहीस. आता तूं मला इथं येऊन जागे केले आहेस. यापुढं मीं कधीही झोपणार नाही असं मी तुला वचन देतो. पण तू मात्र नेहमी उद्योगी राहिलं पाहिजेस. जा आता. यापुढे तुला नेहमीच सुख लाभेल." पण एवढ्याने दीनपालाचे काम संपले नव्हते. तो आपल्या दैवाला म्हणाला, " आणखी काही गोष्टी तुला विचा-रायच्या आहेत." दैव म्हणाले, " ठीक आहे. विचार." मग दीन-पाळाने जांभळाचे झाड, झरा, राजा आणि घोडा यांचे प्रश्न त्याला सांगितले. तेव्हा दैव म्हणाले, " जांभळाच्या झाडाखाली द्रव्याचा हंडा आहे. तो काढून घेतला की त्या झाडाची फळे गोड होतील. झऱ्याचे पाणी बाभळीच्या पायाशी घोटाळतं, पुढे जात नाही त्याचं कारण बाभळीच्या झाडाखाली सोन्याच्या दोन विटा आहेत. त्या काढून घेतल्या की झऱ्याचं पाणी पुढे वाहात जाईल. राजाचा जयस्तंभ पुन्हा पुन्हा कोसळतो. कारण त्याच्या नगरात एक शिवालय आहे. त्याची एक भिंत पडली आहे. तिथून येणाऱ्या वाऱ्याचा झोतानेच जयस्तंभ वारंवार कोसळत आहे. ती भिंत बांधली की तो जयस्तंभ पडणार नाही. आणि मैदानात झाडाखाली उभा असलेला घोडा तुझ्यासाठीच आहे. तू त्याच्यावर स्वार होण्यासाठीच तो सज्ज झाला आहे. जा, त्या

घोड्यावर स्वार हो आणि घराकडे परत जा." अशा रीतीने आपल्या दैवाला जागे करून आणि मार्गात भेटलेल्यांच्या प्रश्नांची उत्तरे घेऊन आनंदी दीनपाल गरुडावर स्वार झाला. आणि ज्या ठिकाणी घोडा उभा होता तेथे तो आला. गरुडाच्या पाठीवरून खाली उतरल्यावर दीनपालने त्या गरुडाला मोठ्या प्रेमाने निरोप दिला. घोड्याची पाठ थोपटून तो त्यावर स्वार झाला आणि झऱ्याच्या काठी असलेल्या वाभळीजवळ आला. तेथे वाभळीच्या झाडाखाली असलेल्या सोन्याच्या दोन विटा त्याने काढताच झऱ्याचे पाणी वेगाने पुढे धावू लागले. दीनपाल पुन्हा घोड्यावर बसला आणि जयस्तंभाजवळ बसलेल्या राजाजवळ येऊन उतरला. त्याला त्याच्या प्रश्नाचे उत्तर सांगताच राजाने ताबडतोब हुशार गवंडी बोलावून शिवालयाला नवीन भिंत बांधली. आणि जयस्तंभ बांधून पूर्ण होईतोपर्यंत त्याने दीनपालला मोठ्या प्रेमाने आग्रह करून ठेवून घेतले व त्याचा सन्मानाने पाहुणचार केला.

काही दिवसानी दीनपालाने निरोप घेतला तेव्हा राजाने त्याला पांचशे मोहरांची थैली 'सप्रेम भेट' म्हणून दिली. तेथून दीनपाल घोड्यावरून दौडत जो निघाला तो थेट जांभळाच्या झाडाखाली येऊन उतरला. झाडाच्या बुंध्याच्या बाजूस असलेली सर्व संपत्ती त्याने खणून बाहेर काढली. ती घेऊन आता खूप श्रीमंत झालेला दीनपाल एका मोठ्या नगरातील भव्य धर्मशाळेत उतरला. त्या नगरात काही दिवस राहून त्याने स्वत:साठी व दीनवती व मुलेबाळे यांच्यासाठी उंची वस्त्रे खरेदी केली. दीनवती-करिता सोन्याचे नानातऱ्हेचे विपुल दागिने त्याने करवून घेतले. मुलाबाळांना व शेजाऱ्यांना देण्यासाठी उत्तम मिठायाचे त्याने दोन पेटारे भरून घेतले आणि एके दिवशी बरोबर पुष्कळ सामान

सुमान व नोकरचाकर घेऊन दीनपालाने चंद्रनगरच्या बाहेर तंबू ठोकून तेथे मुक्काम केला. आपण सुखरूप परत आल्याची वार्ता दीनपालाने नोकराकडून दीनवतीला कळविली आणि तिला आपल्या मुलाबाळांसह बोलावून घेतले. त्यानंतर दीनपालाचे नोकर चंद्रनगरात गेले आणि श्रीमंत दीनपाल व्यापारी नगराबाहेर उतरल्याची खबर त्यांनी व्यापारी पेठेत दिली. त्याबरोबर मोठमोठे व्यापारी दीनपालास भेटण्यासाठी गेले. त्यात धनपालही होताच. दीनपालाचा मोठा लवाजमा, त्याचा थाटमाट आणि श्रीमंतीची राहणी पाहून त्याच्यापुढे आपण छोटेच आहोत असे सर्वांना वाटू लागले. धनपालाला बऱ्याच वर्षांनी आपला भाऊ भेटला म्हणून आनंद झाला. पण आपल्यापेक्षाही तो खूप सधन झाला आहे हे पाहून त्याला थोडे वैषम्य वाटल्यावाचून राहिले नाही.

एके दिवशी धनपाल व धनवती दीनपालाकडे गेले व त्यांनी दीनपाल व दीनवती यांना मुलाबाळांसह आपणाकडे जेवणाचे आमंत्रण दिले. त्या आमंत्रणाचा दीनपाल व दीनवती यांनी मोठ्या आनंदाने स्वीकार केला.

त्या दिवशी आपल्या भावाच्या स्वागतार्थ म्हणून धनपालाने खास मेजवानीचा बेत केला होता. पुष्कळ व्यापाऱ्यांना आणि त्यांच्या स्त्रियांना जेवणाची आमंत्रणे गेली होती. दीनवती सर्व दागिने अंगावर घालून दीनपालाबरोबर धनपालाच्या घरी गेली. धनवतीने तिचे स्वागत केले सर्व स्त्रिया जेवावयास बसल्या. तेव्हा दीनवतीने आपल्या अंगावरील दागिने एकामागून एक काढले य ते तिने पाटावर ठेवले. नंतर आपल्या पानातील पक्वान्ने ती त्या दागिन्यापुढे ठेवू लागली. ते पाहून सर्व स्त्रिया मोठ्या आश्चर्यचकित झाल्या. पण कुणाच्याही तोंडून एक शब्द बाहेर पडला

नाही. शेवटी एका आजीबाईने साहस करून दीनवतीला विचारले, " दीनवती, हे तू काय करीत आहेस ? "

दीनवती म्हणाली, " हे सुग्रास भोजन ज्यांच्यासाठी तयार केलं आहे त्यांना मी ते खाऊ घालीत आहे. ही पक्वान्ने माणसांसाठी नाहीत. ती दागिने, उंची वस्त्रे यांच्यासाठी आहेत. एकदा असे दिवस होते की, ज्यावेळी या घराच्या मालकिणीने आम्हास तुच्छ मानले होते. घरी मुलेबाळे भुकेने व्याकुळ झाली असतांना आम्ही पसरलेला हात तिने झिडकारून टाकला होता. मग मी करते ते बरोबरच आहे ना आजी ? " सर्व स्त्रिया धनवतीला नावे ठेवू लागल्या. धनवतीने सारे बोलणे ऐकले होते. ती धावतच दीनवती पुढे आली. आणि डोळ्यात पाणी आणून म्हणाली, " दीनवती, खरोखरच माझ्या हातून फार मोठी चूक झाली. मला आता खूप पश्चाताप होत आहे. तू आपल्या या थोरल्या वहिणीला क्षमा कर. " हे धनवतीचे बोलणे ऐकून दीनवतीचा राग नाहीसा झाला. तिलाही गहिवर आला. ती चटकन् उठली आणि तिने धनवतीला मोठ्या प्रेमाने आपल्या शेजारी बसवून घेतले. ते पाहून सर्व स्त्रियांनाही आनंद झाला.

धनपालानेही दीनपालाची क्षमा मागितली. तेव्हा दीनपाल त्याला म्हणाला, " दादा, झालं गेलं ते सारं आपण विसरू या. मी सतत उद्योगानं माझ्या झोपलेल्या दैवाला जागे ठेवले आहे. श्रीमान दीनपाल हे त्याचेच फळ आहे. "





एका नगरात मणिभद्र नावाचा एक विणकर राहात होता. तो नानाप्रकारची, नानारंगाची सुंदर वस्त्रें विणीत असे. सोनेरी, रुपेरी धाग्यांनी वस्त्रावर काढलेली वेलबुट्टीची नक्षी पाहून तर लोक आश्चर्याने थक्क होत. अशा सुंदर वस्त्रांची किंमत जास्त असल्यामुळे ती श्रीमंत लोकाखेरीज दुसरे कोण विकत घेणार ? त्यामुळे खूप कष्ट करूनसुद्धा मणिभद्राला कमी द्रव्य मिळत असे. तेवढ्यात त्याला संसाराचा खर्च भागविणे कठीण

जाऊ लागले. संसारात एक आहे तर एक नाही अशी नेहमीच परिस्थिती येऊ लागली. एके दिवशी मणिभद्र आपल्या बायकोला म्हणाला, " आपले शेजारी कितीतरी जाडीभरडी वस्त्रे विणतात. आपल्या कामात ते फार हुशार नाहीत तरीसुद्धा त्यांना माझ्यापेक्षा चौपट द्रव्य मिळते. मी रात्रंदिवस मेहनत घेऊन चांगली वस्त्रे विणतो पण त्यांना गिऱ्हाईक मिळत नाही. या नगरात माझ्या गुणाचे चीज होत नाही. तेव्हा परदेशात जाऊन आपलं नशीब उदयाला येतं की काय ते पहावं, असं मला वाटतं. " तेव्हा मणिभद्राची बायको म्हणाली, " परदेशात जाऊन काही अधिक लाभ होणार नाही. जोपर्यंत भाग्यदेव प्रसन्न होत नाही, तोपर्यंत इथं राहणं किंवा परदेशात जाणं दोन्हीही सारखंच. कुठंच जास्त पैसा मिळणार नाही. चांगले दिवस आले की मग सगळ्याच गोष्टी आपल्या मनासारख्या होऊ लागतील. " मणिभद्र थोडे चिडून म्हणाला, " तुझं आपलं काहीतरीच बोलणं ! उद्योग केल्याखेरीज, कष्ट केल्याखेरीज कशाचीही प्राप्ती होत नाही. जेवणाचे ताट समोर ठेवून पोट भरत नाही. त्यातले पदार्थ हाताने उचलून तोंडात घालावे तेव्हाच पोट भरते. माझ्या मते प्रत्येक माणसाने काहीतरी उद्योग केला पाहिजे. उद्योग करूनसुद्धा जर त्याचे फळ मिळाले नाही तरच स्वतःस दुर्भागी समजले पाहिजे. " अशा रीतीने आपल्या बायकोची समजूत घालून मणिभद्र एका मोठ्या शहरात येऊन राहिला. तेथे त्याच्या व्यवसायाचा चांगलाच जम बसला. त्याने विणलेल्या वस्त्रांना सावकार, राजे, महाराजे यांची मागणी येऊ लागली. वस्त्राबद्दल सांगावे तेवढे द्रव्य त्याला मिळू लागले. अशा प्रकारे त्या शहरात दोन वर्षे राहून मणिभद्राने तीनशे मोहरांची प्राप्ती केली. त्याने विचार केला, आता घरी जावे.

एवढ्या मोहरा पाहून बायकोला फार आनंद होईल. दुसऱ्या नगरात गेल्यावरच आपल्या नवऱ्याच्या उद्योगाचं चीज झालं हेही तिला पटेल.'' एके दिवशी मणिभद्र मोहरांची पिशवी कमरेला बांधून आपल्या गावाकडे निघाला. वाटेत असलेल्या अरण्यातून जात असतांना मणिभद्राला अंधाराने गाठले. रात्रीचा मुक्काम त्याला अरण्यात करणे भाग पडले. चोर व हिंस्र पशूंच्या पासून आपला बचाव व्हावा म्हणून त्याने एक जुनाट वडाचे झाड पसंत केले. त्याच्या दोन मोठ्या फांद्याच्या दुबेळक्यात त्याने आसरा घेतला व तो झोपी गेला. रात्री मणिभद्राला स्वप्न पडले. त्या स्वप्नात त्याने दोन व्यक्ती पाहिल्या. एक होती भाग्यदेव आणि दुसरी होती कर्मदेव. भाग्यदेव कर्मदेवाला म्हणाला, "कर्मदेव, तुला माहीतच आहे की या मणिभद्राच्या नशिबात अन्नवस्त्रापुरतेच द्रव्य मिळण्याचे सुख आहे आणि तू त्याला तीनशे मोहरांची प्राप्ती कशी करून दिलीस ?'' कर्मदेव म्हणाला, "भाग्यदेव, जे उद्योगी आहेत त्यांना त्यांच्या उद्योगाचं फळ देणं माझं काम आहे. जो प्रयत्न करील त्याला त्याचं फळ मिळणारच. आता मणिभद्राच्या बाबतीत तुला काय करायचं असेल ते तू कर.''

कर्मदेव आणि भाग्यदेव यांचे संभाषण ऐकून खडबडून जागा झालेला मणिभद्र उठून बसला. कमरेला बांधलेली मोहरांची पिशवी हलकी लागू लागली म्हणून त्याने ती उघडून राहिली. पिशवीतल्या सगळ्या मोहरा नाहीशा झाल्या होत्या. कपाळाला हात लावून बिचारा मणिभद्र स्वतःशी म्हणाला, "दोन वर्षात कष्टानं साठविलेलं द्रव्य नाहीसं व्हायला एक क्षणहि लागला नाही. आता रिकाम्या हातानी गावाकडे गेलो तर बायको आणि मित्रमंडळी नावे ठेवतील. रिकाम्या हातानी गेला

आणि रिकाम्या हातानीच परत आला असे सर्वजण म्हणतील. तेव्हा अशी फजिती करून घेण्यापेक्षा गावाकडे परत न जाता भाग्यवंत करणाऱ्या शहराकडेच पुन्हा जावे असा विचार करून मणिभद्राने सकाळ झाल्यावर त्या शहराचा रस्ता धरला.

मणिभद्राने एक वर्षभर खूप मेहनत घेऊन नानाप्रकारची उंची उंची वस्त्रे विणली व ती विकून त्याने आठशे मोहरा मिळवल्या. त्या सगळ्या एका थैलीत भरून तो दुसऱ्या मार्गाने गावाकडे निघाला. परंतु सूर्यास्त होण्याच्या वेळी मणिभद्र पुन्हा त्याच वडाच्या झाडाजवळ येऊन पोहोचला. कपाळाला हात लावीत तो उद्गारला, "गेल्या वर्षी ज्या ठिकाणी मी तीनशे मोहरा गमावून बसलो, त्याच ठिकाणी पुन्हा माझ्या नशिबाने मला आणून सोडले. हे झाड टाळण्यासाठी मी दुसरा रस्ता धरला पण त्यानेही चकव्यासारखं मला पुन्हा इथं आणून सोडलं. जेव्हा जिथं जे घडणार आहे तेव्हा तिथं ते घडतंच हे खरं आहे. आता या वडाच्या झाडाचा आसरा घेतल्याशिवाय गत्यंतर नाही." या खेपेस मणिभद्र दुसऱ्या एका जाड फांदीवर चढून बसला. प्रवासामुळें त्याला लवकरच गाढ झोप लागली.

पहाटेच्या सुमारास मणिभद्राला स्वप्न पडले. त्या स्वप्नांत त्याला कर्मदेव व भाग्यदेव यांचे पुन्हा दर्शन घडले. भाग्यदेव कर्मदेवाला म्हणाला, " कर्मदेवा, या मणिभद्राच्या नशिबात अन्न-वस्त्राचेच सुख असतांना तू त्याला आठशे मोहरांची प्राप्ती कां करून दिलीस ?" कर्मदेवाने उत्तर दिले, " भाग्यदेवा, मनुष्याला त्याच्या कर्माचं फळ देणं माझा धर्म आहे. त्या फळाचा तो उपभोग घेऊ शकेल किंवा नाही हे तुझ्या इच्छेवर अवलंबून आहे." त्यांचे बोलणे ऐकून खडबडून जागा झालेला मणिभद्र

उठून बसला. थैली काढून पाहण्यासाठी त्याने गाठोड्यात हात घातला. रिकामी थैली त्याच्या हातात आली. थैलीत असलेल्या आठशे मोहरा नाहीशा झाल्या होत्या. आपण खूप कष्ट करून साठविलेला सर्व पैसा दुसऱ्या खेपेसही नाहीसा झाला. पैशाशिवाय जीवनात काही अर्थ नाही. आणि मिळवलेला पैसा अशा रीतीने नाहीसा होत आहे तेव्हा आता जगण्यात काय मौज आहे. असा विचार करीत मणिभद्र झाडावरून खाली उतरला. आणि जवळच असलेल्या एका पडक्या विहिरीकडे गेला. विहिरीच्या काठांवर उभा राहून तो आत उडी घेणार तोच भाग्यदेव प्रगट झाला आणि त्याने मणिभद्राचा हात धरून त्याला मागे ओढले. भाग्यदेव म्हणाला, "मणिभद्रा, मी भाग्यदेव आहे. तुला अजून जगायचं असल्यामुळं आत्मघात करून घेण्याचा तुला अधिकार नाही. तसं तू करू नकोस. मी तुला एक वर देतो. सांग तुला काय पाहिजे?"

"भाग्यदेवा," मणिभद्र म्हणाला, "मी धनवंत व्हावे असा मला वर द्या."

भाग्यदेव हसत म्हणाला, "अरे पण तू धन घेऊन काय करणार आहेस? धनाचा उपभोग घेणं तुझ्या नशिबातच नाही."

"तसं असेल तरीसुद्धा मला धन हवे आहे. या जगांत कितीतरी अशी श्रीमंत माणसें आहेत की जी दुर्बलतेमुळे आणि कंजूष स्वभावामुळे आपल्या धनाचा उपभोग घेऊ शकत नाहीत. पण ती श्रीमंत असल्यामुळेच समाजात त्यांचा मान सन्मान होतो. नातलग व मित्र मंडळीचे ते फार आवडते होतात. त्यांच्या अंगी दुर्गुण किंवा काही उणीवा असल्या तरी त्यांच्यासंबंधी कोणीही त्यांच्यासमोर तसं बोलण्याचं धाडस करीत नाही. धनाचं सुख

माझ्या नशिबी लिहिले नसले तरी काही हरकत नाही. पण लोकांनी मला श्रीमंत म्हणावं अशी माझी फार इच्छा आहे."

"ठीक आहे." भाग्यदेव म्हणाला, "मणिभद्रा, तू आता परत शहरात जा. तेथे तुला एका व्यापाराचे दोन मुलगे भेटतील. त्यापैकी एक आहे धनसंचय करणारा. आणि दुसरा आहे धन वाटून टाकणारा. त्या दोघांपैकी कोणासारखे तुला व्हावयाचे आहे तें विचार करून पसंत कर. तसा तू होशील अशी मी तुझी व्यवस्था करतो." एवढे सांगून भाग्यदेव अदृश्य झाला.

सकाळ झाल्यावर मणिभद्र पुन्हा शहराकडे निघाला. शहरात आल्यावर धनसंचय करणाऱ्या व्यापाऱ्याच्या मुलाचा पत्ता विचारीत तो एका गल्लीत आला. तेथे उभा असलेल्या एका माणसाला मणिभद्राने विचारले, "एका व्यापाराचा फार श्रीमंत मुलगा इथं राहतो असं ऐकलं आहे. कृपा करून मला त्याचा पत्ता सांगता का ?" तो माणूस तुच्छतेने उद्‌गारला, "तो कंजूष, पैशा-पैशासाठी जीव टाकणारा माणूस ? त्याच्या बद्दल तर काहीच बोलू नका." मणिभद्राने दुसऱ्या माणसाला विचारले. तेव्हा तो मणि-भद्राला म्हणाला, "तुम्ही आमच्या गावचे दिसत नाहीत. अहो, सकाळच्या प्रहरी तशा कंजूष मतलबी माणसाचं नावसुद्धां घेऊ नये, समजलं !" बिचारा मणिभद्र तशा माणसाचं तोंड पाहायला निघाला होता. त्या व्यापाऱ्याच्या मुलाने एवढी दुष्कीर्ती संपादन केली होती की कोणीही त्याचे नाव कानावर पडू देत नव्हता. ही गोष्ट मणिभद्राला समजली.

बराच वेळ इकडेतिकडे शोध केल्यानंतर अखेर मणिभद्राला कंजूष व्यापारी मुलाचे घर सापडले. मणिभद्राने घरमालकाची भेट होण्याची इच्छा दाखविली. पण नोकरचाकरांनी त्याला

झिडकारून टाकले. पण मणिभद्र त्याच्या अंगणात बसून राहिला. रात्री कंजूष सावकार पुत्राच्या बायकोने त्याला जेवावयास घातले. ती दयाळू व परोपकारी होती. पण आपल्या नवऱ्याचा स्वभाव तिला चांगलाच माहीत असल्याने कोणा भुकेल्या तहानेल्याला काही देण्याचं धाडस उघडपणे ती करीत नसे. मणिभद्र रात्री अंगणातच झोपला. त्याच्या स्वप्नांत पुन्हा भाग्यदेव व कर्मदेव आले. भाग्यदेवाने कर्मदेवाला म्हटले, "कर्मदेवा, हे तू काय केलंस? या कंजूष सावकार पुत्राच्या नशिबात पैसे खर्च करणं लिहिलंच नाही. तेव्हा या मणिभद्राला जेवण देऊन त्याला विनाकारण खर्चात का टाकलेस?" कर्मदेव म्हणाला, "भाग्यदेवा, मला जे योग्य वाटलं ते मी केलं. आता तुझी इच्छा असेल त्याप्रमाणे तू कर."

दुसऱ्या दिवशी व्यापारी पुत्र आजारी पडला. अन्नावाचून त्याला काही दिवस राहावे लागले. त्यामुळे मणिभद्राला उपास पडू लागले. तेव्हा त्याने कंजूष व्यापारी पुत्राचे घर सोडले. आणि धन वाटणाऱ्या दुसऱ्या व्यापारी पुत्राच्या शोधार्थ तो निघाला. तो ज्या गल्लीत राहात होता तेथे मणिभद्र येताच त्याला लहानथोर सर्वांच्या तोंडून त्या व्यापारी पुत्राची प्रशंसा कळली. एका माणसाने तर मणिभद्राचा हात धरून त्याला थेट व्यापारीपुत्राच्या घरी नेऊन सोडले. त्या परोपकारी व्यापारी पुत्राने मणिभद्राचे मोठ्या प्रेमाने व आदराने स्वागत केले. त्याला पोटभर सुग्रास जेवण दिले. उंची उंची कपडे त्याला घालावयास दिले आणि रात्री त्याच्या झोपण्याची उत्तम व्यवस्था करून तो स्वतः झोपण्यासाठी निघून गेला.

रात्री मणिभद्राला पुन्हा भाग्यदेव व कर्मदेव यांचे दर्शन झाले. भाग्यदेव कर्मदेवाला म्हणाला, "कर्मदेवा, या परोपकारी व्यापारीपुत्राने मणिभद्राचे आदरातिथ्य करण्यास स्वत:जवळचे उरले सुरले सगळेच धन वेचले आहे. तेव्हा उद्या त्याच्या खाण्या-पिण्याची व्यवस्था कशी होणार?"

कर्मदेव म्हणाला, "भाग्यदेवा, चांगले कर्म करण्याची प्रेरणा देण्याचं माझं काम आहे. आता बिघडलेलं काम सुरळीत चालू ठेवण्याचं तुझ्या स्वाधीन आहे. सावकार पुत्राचं भाग्य आता तू आणखी उजळ कर."

दुसऱ्या दिवशी राजदरबारातून राजातर्फे एक नोकर शंभर मोहरांची थैली घेऊन आला आणि त्याने ती परोपकारी व्यापारी-पुत्राच्या स्वाधीन केली.

ते पाहून मणिभद्र विचार करू लागला. धनसंचय करून लखपती होणाऱ्या त्या दुर्दैवी कंजूष व्यापारी पुत्रापेक्षा धन वाट-णाऱ्या या परोपकारी व्यापारीपुत्राप्रमाणे आनंदात राहणे लाख-पटीने चांगले आहे. कारण धनाचा सदुपयोग ते परोपकारीपणे, योग्य त्या मार्गाने खर्च करणे हाच होय. ज्या धनिकाचा पैसा सत्कारणी खर्च होत नाही त्याच्यापेक्षा निर्धन असलेले चांगले. जो पूज्य बुद्धीने धर्माचे आचरण करतो त्यालाच धर्मात्मा म्हणतात. नुसता कोरडा धर्मोपदेश करून कोणी धर्मात्मा होत नाही. म्हणून हे भाग्यदेवा, आपण मला परोपकारी व्यापारी पुत्राप्रमाणे धनवंत करा.

—

मणिभद्राच्या इच्छेप्रमाणे भाग्यदेवानें त्याला परोपकारी व्यापारी पुत्राप्रमाणे धनवंत केले. मणिभद्र आपल्या नगरात परत आला. तेथे त्याचा व्यवसाय जोरात चालू लागला. त्याला खूप पैसा मिळू लागला. तो सगळा मणिभद्र परोपकारार्थ खर्च करू लागला. अशाप्रकारे मन मानेल तेवढे धन तो जरी साठवू शकला नाही तरी त्याने सर्वत्र खूप कीर्ती संपादन केली आणि तीच मणिभद्राची आणि त्याच्या बायकोची अक्षय आनंदाची आणि समाधानाची संपत्ती होती.



# देवानदिले-कर्माने मिळाले

ही एक फार प्राचीन काळची गोष्ट आहे. एकदा लक्ष्मी व सरस्वती यांची भेट झाली. बोलता बोलता लक्ष्मी म्हणाली, "माझ्या आशीर्वादापुढं कर्माचं काही चालत नाही." "छे छे, माई असं कसं म्हणतां?" सरस्वती म्हणाली, "ज्याला त्याला आपल्या कर्माचं फळ भोगावंच लागतं. तुमचा त्याला आशीर्वाद असला तरी सुद्धां." अशा रीतीने लक्ष्मी व सरस्वती या पेन देवतात वाद निर्माण झाला. थोड्या वेळाने लक्ष्मी

सरस्वतीला म्हणाली, "चल, कोणाचं म्हणणं खरं आहे ते आपण पाहू या. पलीकडे माझं मंदिर आहे. तेथे असलेल्या माझ्या मूर्तीच्या मागं आपण दोघी लपून राहू. धनाच्या इच्छेनं त्या मंदिरात जो पहिल्यांदा येईल त्याला मी माझ्या इच्छेप्रमाणे धन देईन. मग पाहू या तो सुखी होण्याच्या आड त्याचं कर्म कसं येतय् ते." सरस्वती म्हणाली, "ठीक आहे. मी तशी तुम्हास तीन वेळा संधी देते." एवढे बोलून दोन्ही देवता पृथ्वीवर उतरल्या आणि मंदिरात जाऊन लक्ष्मीच्या मूर्तीमागे लपून राहिल्या.

लक्ष्मी मंदिराजवळ बनपूर नावाचे गांव होते. त्या गावात रतन नांवाचा एक लाकूडतोड्या राहात होता. त्याच्या बायकोचे नांव होते रत्ना. रानात जाऊन लाकडे तोडायची व त्यांची मोळी बनपूरच्या बाजारात विकून, मिळतील त्या पैशाचे धान्य, मोठ-मिरची आणायची असा रतनचा दिनक्रम होता. रत्नाही शेजार-पाजाऱ्यांची कामे करून संसाराचा गाडा ओढण्यास मदत करीत होती. मोठ्या दारिद्र्यात ती नवराबायको आपले जिणे कंठीत होती.

गेल्या तीन दिवसापासून मुसळधार पाऊस पडत होता. त्यामुळे रतनला लाकूडतोड करण्याकरिता घराबाहेर पडता आले नाही. रोजच्या कमाईवरच जीवन अवलंबून असल्याने रत्ना व रतन या दोघांना अन्नाच्या अभावी तीन दिवस उपाशी राहावे लागले. चौथ्या दिवशी पहाटे पाऊस थांबल्यावर रतन कुऱ्हाड घेऊन लाकूडतोड करण्याकरिता रानात गेला. लाकडे तोडून त्याने त्यांची मोळी बांधली. जवळपासच्या झाडावर फुललेली रानफुले त्याने गोळा केली व तो लक्ष्मीच्या मंदिराकडे निघाला. मंदिराजवळ आल्यावर त्याने लाकडांची मोळी एका बाजूस ठेवली व रानफुले घेऊन तो मंदिराच्या गाभाऱ्यात गेला. रतन मोठा भाविक

होता. कारण त्याच मंदिरातील मूर्तीमागे लक्ष्मी व सरस्वती लपल्या होत्या. शिवाय त्या मंदिरात प्रथम त्यानेच पाऊल टाकले होते. रतनने मोठ्या भक्तीने लक्ष्मीची पूजा केली. तिला फुलें अर्पण केली आणि धन प्राप्त व्हावे म्हणून डोळे मिटून तो तिची प्रार्थना करू लागला. त्याचवेळी लक्ष्मीने आपल्या दोन्ही हातांनी रतनच्या भोवती मोहोरांची वृष्टी केली. मोहोरांच्या आवाजाने दचकून रतनने डोळे उघडले. त्याच्या आजूबाजूस पिवळ्या धमक सोन्याच्या मोहोरांचा सडा पडलेला होता. रतन डोळे फाडफाडून त्या चमकणाऱ्या मोहोरांकडे पाहू लागला. हे सत्य आहे की स्वप्न आहे काहीच त्याला समजेना. तो भांबावून गेला. भीत-भीतच हात पुढे करून त्याने एका मोहोरेला स्पर्श केला. हळूच त्याने ती उचलून हातात घेतली. आता त्याचा आनंद गगनात मावेना. लक्ष्मी आपल्यावर प्रसन्न झाली अशी त्याची खात्री झाली. त्याने मोठ्या भक्तिभावाने पुन्हा पुन्हा आपले मस्तक लक्ष्मीच्या चरणावर ठेवलं.

थोड्या वेळाने रतनने सर्व मोहोरा गोळा केल्या. इतक्यात त्याची नजर कोनाड्यात असलेल्या रांजणाकडे गेली. त्याने तो रांजण उचलून खाली घेतला आणि त्यांत सर्व मोहोरा भरल्या. बाहेर येऊन त्याने तो रांजण मोळीमध्ये व्यवस्थित लपविला व तो घराकडे निघाला.

अंगणात आल्याबरोबर रतनने "रत्ना, रत्ना, बाहेर ये. हे बघ मी काय आणलंय् ते." असे म्हणण्याचा सपाटा चालविला. परंतु रत्ना घरात नव्हती. ती शेजारणीकडे पाठ उसने मागण्याकरिता गेली होती. रतनने लाकडाची मोळी दाराजवळ ठेवली व रत्नाला शोधायला तो बाहेर पडला. थोड्याच वेळात तिला

घेऊन तो आला. रतन मोठ्या आनदान लक्ष्मीच्या देवळात घडलेली घटना सांगत होता. पण रत्नाचा त्याच्या सांगण्यावर विश्वास बसला नाही. ती झटकन् पुढे झाली आणि तिने मोळीची दोरी सोडली. मोहोरांनी भरलेला छोटा रांजण नाहीसा झाला होता. उरली होती फक्त वेडीवाकडी लहानमोठी लाकडे. मोठ्या निराशेने रतन जमिनीवर कोलमडून पडला. उगीच थापा मारल्या-बद्दल रत्ना त्याला रागाने शिव्या देऊ लागली.

दुसऱ्या दिवशी सकाळी रतन लाकडाची मोळी व फुले घेऊन लक्ष्मीच्या मंदिरात आला. लक्ष्मीला वाटले होते की रतन आता खूप श्रीमंत झाला असणार म्हणून पूजेची सर्व सामग्री आणून तो आपली यथासांग पूजा करील. परंतु डोळ्यात पाणी आणून रतनने रांजण नाहीसा झाल्याची हकीगत लक्ष्मीच्या चरणी सांगितली. रतन जेव्हा डोळे मिटून प्रार्थना करू लागला तेव्हा लक्ष्मीने आपल्या अंगावरील टपोऱ्या मोत्यांची माळ त्याच्या पुढ्यात टाकली. रतनने डोळे उघडले, तेव्हा लक्ष्मीने दिलेला प्रसाद पाहून त्याला खूप आनंद झाला. त्याने तो मोत्यांचा हार उचलून घेतला. आणि खिशात ठेवला. मंदिराच्या बाहेर येऊन रतनने मोळी डोक्यावर ठेवली. आणि तो घराकडे निघाला. वाटेत त्याच्या मनांत विचार आला. " काल आपणाला लक्ष्मीच्या कृपेने खूप संपत्ती मिळाली पण आपण स्नान करून तिची भक्तीने पूजा केली नाही म्हणूनच तिने दिलेली सर्व संपत्ती नाहीशी झाली. आज लक्ष्मीने पुन्हा कृपा केली आहे. तेव्हा स्नान करून तिची पूजा करावी आणि मग घरी जावे हे बरे." असा विचार करून तो नदीकाठी गेला. नदीच्या काठावर त्याने अंगरखा काढून ठेवला. आणि स्नानासाठी तो नदीच्या पाण्यांत शिरला.

काठावर ठेवलेल्या अंगरख्याच्या खिशातून अर्धवट बाहेर आलेला मोत्याचा हार सूर्यप्रकाशांत चमकत होता. काठाजवळ पोहत आलेल्या एका माशाला वाटले की तो चमकणारा हार म्हणजे खाण्याची एखादी वस्तूच आहे. त्याने तो हार चटकन् पाण्यात ओढून घेतला आणि तो गिळून टाकून तो मासा पोहत पोहत दूर निघून गेला.

रतन स्नान करून काठावर आला. त्याने अंगरखा उचलून घेतला. खिशात हात घालून पहातो तो हार नाहीसा झालेला. अत्यंत दुःखित होऊन तो मोत्यांचा हार इकडे तिकडे शोधू लागला, पण त्याला तो सापडला नाही. घरी परतल्यावर मोठ्या दुःखित अंतःकरणाने त्याने घडलेली घटना रत्नाला सांगितली. पण रत्नाचा त्याच्या बोलण्यावर विश्वास बसला नाही. उलट खोटे बोलण्याबद्दल तिनेच त्याची कानउघाडणी केली.

तिसऱ्या दिवशी रतन जरा उशीराच लक्ष्मीच्या मंदिरात गेला. तो येण्यापूर्वी लक्ष्मी सरस्वतीला म्हणाली, "पहा, ताई, आज रतन इथं येणार नाही. आता तो खूप श्रीमंत झाला आहे. ही माणसे फार कृतघ्न असतात."

पण थोड्याच वेळात रतन दुःखित अंतःकरणाने डोळे पुशीत तेथे आला आणि घडलेली कर्मकथा त्याने लक्ष्मीच्या चरणी सांगितली. लक्ष्मी, सरस्वतीच्या कानात कुजबुजली, "हा मनुष्य महामूर्ख आहे असं मला वाटतं." "छे, तो महामूर्ख नाही. माई, त्याचा कर्मभोग अजून संपला नाही." सरस्वती हळूच म्हणाली. लक्ष्मी चिडूनच उद्गारली, "कर्मभोग! कर्मभोग! या खेपेस या माणसाला मी एक मूल्यवान परीस देते. पाहू या त्याच्यापासून तो कोण हिरावून नेऊ शकतो ते." असं म्हणून तिने एक परीस

रतनच्या पुड्यात टाकला. लक्ष्मीने दिलेला प्रसाद रतनने चटकन् उचलला आणि मुठीत गच्च धरून तो घराकडे धावत सुटला. कारण तो लक्ष्मीचा प्रसाद रत्नाला केव्हा एकदा दाखवीन असे त्याला झाले होते.

अर्ध्या रस्त्यावर आल्यानंतर लक्ष्मीने दिलेला परीस मुठीत आहे की नाही ते पाहण्याकरिता रतनने आपली मूठ उघडली. सूर्यप्रकाशात चमकणाऱ्या त्या लाल परीसाला मांसाचा तुकडा समजून एक घार विजेच्या चपळाईने खाली आली आणि तिने रतनच्या हातातील परीसावर झडप घातली. रतनच्या हाताला हिसका बसला. परीस घेऊन ती घार क्षणार्धात दूर निघून गेली. बिचाऱ्या रतनने 'देवानं दिलं पण कर्मानं नेलं' असं मोठ्या दु:खाने म्हणत आपल्या कपाळाला हात लावला.

दु:खी, कष्टी होऊन रतन घरी परतला. परीस गमावून बसल्याची हकीगत त्याने रत्नाला सांगितली नाही. सांगून तरी काय उपयोग होता? त्या हकीगतीवर तिचा विश्वास बसला नसता. उलट त्यालाच तिची बोलणी खावी लागली असती. घरी आल्यावर रतन मुकाट्याने डोळे मिटून पडून राहिला. त्याची दु:खी-कष्टी मुद्रा पाहून रत्नाचे हृदय भरून आले. ती त्याचे सांत्वन करूं लागली. ती म्हणाली, "देवाने दिलं ते आपल्या नशिबात नव्हतं. आता त्याच्याबद्दल कशाला कष्टी व्हायचं? मोलमजुरी करून मिळविलेली मीठभाकरच आपल्या सत्तेची. उद्या रानातून मोळी घेऊन तुम्ही सरळ बाजारांत जा आणि ती विकून सरळ घरी परत या."

दुसऱ्या दिवशी रतन भल्या सकाळीच रानांत गेला. तोडलेली लाकडे गोळा करून त्याने त्यांची मोळी बांधली. आणि बाजारचा रस्ता धरला. लक्ष्मीच्या मंदिराकडे तो गेला नाही.

इकडे लक्ष्मी सरस्वतीला म्हणाली, " रतन आता लक्षाधीश झाला असणार. माझं दर्शन घ्यायला आता तो मुळीच येणारच नाही." सरस्वती म्हणाली, "नाही, माई! रतन लक्षाधीश झालेला नाही. तो होता तसा आजही दरिद्रीच आहे. आज संध्याकाळी त्याचा कर्मभोग संपेल. नंतर तो खचितच लक्षाधीश होईल."

रतनने लाकडाची मोळी आठ आण्याला विकली. त्या पैशाचे त्याने पीठ, मीठ, तेल व एक मासा एवढे जिन्नस खरेदी केले आणि संध्याकाळी तो घरी परतला. रतनची खरेदी पाहून रत्नाला फार आनंद झाला. ती मोठ्या खुशीतच स्वयंपाकाच्या तयारीला लागले. रतन कुऱ्हाड घेऊन थोडी लाकडे आणण्याकरिता घराबाहेर पडला. वनपूरच्या वेशीबाहेर एक जुनाट उंच झाड होते. त्याच्या खालच्या बाजूच्या काही फांद्या वाळलेल्या होत्या. त्यापैकी एका फांदीवर रतनने कुऱ्हाडीचा घाव घालताच वरच्या बाजूस असलेले घारीचे घरटे हादरले. आणि त्यातून एक लाल वस्तु बाहेर पडली. हातातली कुऱ्हाड टाकून रतन धावतच त्या वस्तूजवळ गेला. घारीने त्याच्या हातावर झडप घालून नेलेला तो लक्ष्मीचा प्रसाद–परीस होता. रतनने तो चटकन उचलला व कपाळाला लावला आणि कुऱ्हाड व लाकडे जिथल्या तिथं टाकून त्याने एकदम घराकडे धूम ठोकली. अंगणात आल्याबरोबर तो जोरात ओरडला, " रत्ना, चोर सांपडला; चोर सांपडला.",


इकडे रत्नाने जेव्हा स्वयंपाकाच्यावेळी मासा चिरला तेव्हा त्याच्या पोटातून मोत्याचा हार बाहेर पडला होता. तो लगबगीने उचलून रतनला दाखविण्यासाठी ती दाराकडे धावली. तीही जोरात ओरडली, "चोर सांपडला, चोर सांपडला."

ही आरडाओरड रत्नाच्या शेजारी राहात असलेल्या म्हातारीच्या कानी पडली. ती फार घाबरून गेली. कारण रतनच्या मोळीतून मोहोरांनी भरलेला छोटा रांजण तिनेच चोरून नेला होता. तिला वाटले आपली चोरी रतन व रत्ना यांना समजली व ते आपणास पकडण्यास येत आहेत. म्हातारीने चटकन् मोहोरांनी भरलेला रांजण घेतला आणि गुपचुप मागील दाराने रत्नाच्या स्वयंपाकघरात जाऊन तेथील कोनाड्यात तो ठेवून ती मुकाट्याने परत गेली.

रतन व रत्ना यांनी स्वयंपाकघरात पाऊल टाकताच त्यांची दृष्टी रांजणाकडे गेली. त्यांना फार आश्चर्य वाटले व खूप खूप आनंदही झाला.

लक्ष्मीने प्रसाद म्हणून दिलेल्या तिन्ही वस्तू आता त्यांना पुन्हा प्राप्त झाल्या. त्यांचे जन्माचे दारिद्र्य नाहीसे झाले. साक्षात् लक्ष्मी त्यांच्या घरी वास करू लागली.

मंदिराच्या गाभाऱ्यातील नंदादीपाच्या अखंड प्रकाशात लक्ष्मीची हास्यवदन मूर्ती अधिकच तेजाने विलसित राहिली.





# गणपतीची देणगी

रामपूरच्या वेशीबाहेर एक जुनाट वडाचे झाड होते. त्याच्या जाड व लांब पारंब्या चारी बाजूस जमिनीत शिरलेल्या होत्या. त्यामुळे ते वडाचे झाड एखाद्या भव्य हिरव्यागार तंबूप्रमाणे दिसत होते. त्याच्याजवळ गणपतीचे एक छोटे मंदीर होते. रामपूरचे नागरिक सकाळ संध्याकाळ गणपतीचे दर्शन घेण्याकरिता त्या मंदिरात येत असत. मंदिरापासून जवळच एक झोपडी होती. तिथे रामचरण नावाचा एक भिकारी राहात होता.

रामपूर लहान असल्याने रामचरणला गावांत पोटभर भिक्षा मिळत नसे म्हणून गणेशमंदिराच्या दरवाज्याजवळ तो बसू लागला. त्याच ठिकाणी आपणास भरपूर भिक्षा मिळेल असे त्याला वाटले.

रामचरण दिवसभर मंदिराच्या दाराजवळ बसे आणि देव-दर्शनासाठी कोणी येऊ लागले की मोठ्याने 'शिवहर, शिवहर, गणेश, गणपती,' असा पुकारा करी. गरीब बिचारा दिवसभर शिवाचे व गणपतीचे नाव घ्यायचा पण संध्याकाळपर्यंत दोनचार मुठी धान्य, एखाद दुसरे फळ आणि चारसहा पैसे एवढीच भिक्षा त्याला मिळायची. एवढ्या अल्प भिक्षेने कोणाचे पोट भरणार ? रामचरण एकटाच असता तर तेवढ्यातहि त्याने आनंद मानला असता. कारण भूक सोसायची त्याला सवय झाली होती. पण त्याला रमा नावाची एक छोटी मुलगी होती. ती चतुर व शहाणी होती. परंतु चातुर्य व शहाणपणा यांनी पोटातली भुकेची आग काही शांत होत नाही. भुकेने रमाचा जीव व्याकुळ झाला की रामचरणच्या पोटात कालवाकालव होई. आणि त्याचे डोळे पाण्याने भरून येत. तिच्यासाठी हमाली करून पैसे मिळवावे असे त्याला वाटे. पण याही गोष्टीस त्याचे दुबळे शरीर त्याला मनाई करीत होते.

ग्रीष्म ऋतूतील दुपारची वेळ होती. कडक उन्हाने आकाश व धरणी जणू जळत होती. चोहीकडे शांतता पसरली होती. अशा वेळी शंकर पार्वती मनुष्यांची सुखदु:खे पाहण्याकरिता वेषांतर करून पृथ्वीवर उतरली. फिरत फिरत ती दोघे रामपूर जवळील गणेश मंदिरासमोर आली. त्यांना पाहून रामचरण जोरजोराने 'शिवहर शिवहर, गणेश गणपती' असा पुकारा करू लागला. भिकाऱ्याची दारिद्र्यावस्था पाहून पार्वतीमाईला त्याची दया आली.

ती श्रीशंकरास म्हणाली, " अहो त्या गरीब भिकाऱ्याकडे पहा, बिचारा किती दुःखी आहे ! पहा किती भक्तीने आणि प्रेमाने तो तुमच्या नावाचा जप करतो आहे. पण तुम्ही किती कठोर ! आजपर्यंत तुम्ही त्याच्यावर थोडी सुद्धा दया केली नाही. मी असं ऐकलं होतं की अलीकडे पृथ्वीवरील माणसे फार पापी झाली आहेत. ते देवदेवतांची पूजा करीत नाहीत. पण आज मला समजलं की त्यात त्यांचा काही अपराध नाही. खरोखर सर्व अपराध देवदेवतांचाच आहे. पहा हा माणूस ! गरीब बिचारा आज कितीतरी वर्षे तुमच्या नावाचा जप करीत आहे. तरीसुद्धा या अभाग्याला पोटभर खायला मिळत नाही. देवदेवंता जर कठोर होऊ लागल्या तर त्यांची पूजा तरी कुणाला करावीशी वाटणार ?"

पार्वतीमाईचे बोलणे श्रीशंकराला लागले. ते पार्वतीमाईला म्हणाले, " खरी गोष्ट काय आहे ती तू जाणत नाहीस. कारण तुझं हृदय कोमल आहे. पण तू काही चिंता करू नकोस. या भिकाऱ्याचं दुःख दूर करण्याची मी ताबडतोब व्यवस्था करतो. "

एवढे बोलून श्रीशंकर पार्वतीमाईसह गणपतीच्या मंदिरात गेले. माता पिता येत असलेले पाहून गणपती उठून उभा राहिला. मोठ्या प्रेमाने त्याने मातापित्यांना वंदन केले. श्रीशंकराने गणपनीला प्रेमपूर्वक आशीर्वाद देऊन म्हटले, " वत्सा, हा भिकारी कितीतरी वर्षे तुझ्या दारात बसून तुझ्या व माझ्या नावाचा जप करीत आहे. परंतु तू त्याच्यावर अद्याप दया केली नाहीस. आता अशी काही व्यवस्था कर की त्यायोगे त्या बिचाऱ्याचं जन्माचं दारिद्र्य दूर होईल. "

गणपती हात जोडून म्हणाला, " ठीक आहे पिताजी, सात दिवसांच्या आत त्याचं दारिद्र्याचं दुःख नाहीसं होईल. त्याला

कुठून ना कुठून तरी एक लाख रुपये मिळतील." गणपतीचे उत्तर ऐकून श्रीशंकर व पार्वतीमाई यांना समाधान वाटले. आणि ते पुढे निघून गेले.

त्याचवेळी दीनदयाळ नामाचा एक फार श्रीमंत पण लोभी आणि कंजूष सावकार गणपतीची पूजा करण्याकरिता मंदिरात आला होता. त्याने खांबाच्या आड लपून श्रीशंकर व गणपती यांचे सर्व संभाषण ऐकले होते. त्याने विचार केला की ही सुवर्ण संधी आहे. थोडी चतुराई आणि सावधगिरी दाखविली तर सहजच एक लाख रुपये मला मिळतील.

मोठ्या खुषीतच दीनदयाळ रामचरण जिथे बसला होता, तिथे गेला आणि त्याला आदराने नमस्कार करून त्याच्याजवळ बसला. रामचरणला आजपर्यंत कोणीच नमस्कार केला नव्हता किंवा आपलेपणाने त्याच्याजवळ कोणी येऊन बसलेही नव्हते. दीनदयाळाच्या वागण्यावरून तो कोणी भला माणूस असावा असे रामचरणला वाटले. त्याला फार आनंद झाला. तो दीनदयाळला म्हणाला, "बाबा, आपण फार दयाळू दिसता. सांगा, माझ्याकडे येण्याची तसदी कां घेतली ? मी एक गरीब भिकारी आहे हे तुम्हास माहीत नाही कां ? "

दीनदयाळला आपला स्वार्थ साधून घ्यावयाचा होता. रामचरणला मोठेपणा देत तो म्हणाला, "काय आपण भिकारी ? छे, छे, कोण म्हणतो आपणास भिकारी ? आपण थोर महात्मे आहात. आपल्या दर्शनानं पाप नाहीसं होतं. मीही आपलं दर्शन घेण्याकरिता आलो आहे. मला आपणास काही विचारावयाचे आहे. आपली आज्ञा झाली तर विचारावे म्हणतो."

"विचारा की" रामचरण म्हणाला. "दिवसभरातून आपणास किती भिक्षा मिळते?" "बाबा, भिक्षा मिळण्याची गोष्ट काय विचारता? रोजच उपाशी राहावं लागतं. कधी दोन-चार मुठी धान्य मिळतं तर कधी दोनचार पैसेही मिळतात. कशा रीतीने जगतो आहे ते माझं मलाच माहीत." कपाळाला हात लावीत रामचरण म्हणाला. "अरेरे!" दीनदयाळ खोटेच कळवळून म्हणाला. "आपणासारख्या महात्म्याची काय ही दशा! रामपूरच्या लोकांना भल्या माणसाची पारख नाही. तुम्हांला ते थोडी देखील मदत करीत नाहीत. माणुसकी विसरणारी असली कसली ही माणसे! मला तर तुमची फार दया येते. आपली काही सेवा करावी अशी माझी अत्यंत इच्छा आहे."

"बाबा, तुम्ही माझी कसली सेवा करणार?" दीनदयाळ ढोंगीपणाने हंसत म्हणाला, "माझी फार फार इच्छा की आपणास काही मदत करावी. तेवढीच आपली सेवा केल्यासारखं होईल. पण एवढी एकच गोष्ट आपण लक्षांत घ्या की आजपासून सात दिवस आपणास जी काही भिक्षा मिळेल ती सर्व मला द्या. तिच्या बदल्यांत मी आपणांस शंभर रुपये देईन."

शंभर रुपये हे शब्द ऐकताच रामचरणला खूप आनंद झाला. तो विचार करू लागला. शंभर रुपये मिळाले तर किती चांगलं होईल! इथं दिवसभर बसून सात दिवसात दहा पैशांची भिक्षाही मिळणार नाही. सात दिवसांच्या भिक्षेसाठी शंभर रुपये सोडून देणं, खरोखर मूर्खपणाचे होईल. एकदम त्याला रमाची आठवण झाली. त्याला वाटलं आपण शंभर रुपये घरी घेऊन गेलो आणि रमा रागावली तर – तिचाही विचार घेतला पाहिजे. तो दीनदयाळला म्हणाला, "बाबा तुम्ही माझ्यावर फार दया दाख-

विली आहे. गणपती, तुमचे कल्याण करो. तुम्ही मला जे सांगितलं त्याच्यासंबंधी विचार करून मी तुम्हाला उद्या कळवीन. आता मला काही सांगता येणार नाही." "ठीक आहे, महाराज. काही हरकत नाही. उद्या सांगा." असे म्हणून रामचरणला नमस्कार करून दीनदयाळ निघून गेला.

रामचरणने घरी गेल्यावर घडलेली सर्व हकीगत रमाला सांगितली. चतुर रमाने ताबडतोब ओळखले की शंभर रुपये देण्यात दीनदयाळचा काहीतरी डाव आहे. ती आपल्या पित्याला म्हणाली, "बावा, दीनदयाळ आपला काहीच फायदा होत नसतांना शंभर रुपये देण्यास तयार होतो, यात त्याचा काहीतरी हेतु आहे आणि तो चांगला नसणारच. उद्या मी तुमच्या बरोबर येते आणि दीनदयाळशी बोलून सगळ्या गोष्टीचा खुलासा करून घेते. तुम्ही मात्र नुसतं ऐकायचं काम करायचं. एकही शब्द मधे बोलायचा नाही."

दीनदयाळला रात्रभर झोप आली नाही. रामचरण आपल्या म्हणण्यास होकार देईल की नाही याबद्दल तो साशंक झाला होता. सकाळ होताच तो रामचरणकडे आला व म्हणाला, "महाराज, विचार करून आपण काय ठरविलं आहे ते सांगा." रामचरण शेजारी रमा बसली होती. तिने उत्तर दिले, "धनी, आम्ही आपल्या म्हणण्याचा विचार केला आहे. शंभर रुपयानं काय होणार आहे? एवढा स्वस्त सौदा करण्याची आमची तयारी नाही. माफ करा."

रमाचे उत्तर ऐकून आकाशातून कुऱ्हाड कोसळल्यासारखी दीनदयाळची स्थिती झाली. पण लाख रुपये मिळण्याचा मोह आवरणे त्याला अशक्य होते. तो दोनशे रुपये देण्यास तयार

झाला. रमाची आता खात्री झाली की काहीतरी फार मोठ्या लाभासाठीच दीनदयाळ एवढे रुपये देऊ इच्छित आहे. ती म्हणाली, "धनी, एवढा स्वस्त सौदा कसा जमविता येईल. शंभर दोनशे किंवा हजार दोन हजार यांनी काय होणार ? "

दीनदयाळची आता पाचावर धारण बसली, पण तो पक्का लोभी असल्यामुळे शंभर दोनशे अशी रक्कम वाढवीत वाढवीत ठरलेल्या सौद्यासाठी पन्नास हजार रुपये देण्यास तो तयार झाला.

रमाने विचार केला, "पन्नास हजार रुपये म्हणजे खूपच मोठी रक्कम आहे. आता आढेवेढे घेणे योग्य नाही. सोन्याची संधी निघून जाईल. याच घडीला हा सौदा पक्का करून टाकला पाहिजे." असा विचार करून ती दीनदयाळला म्हणाली, "ठीक आहे. आपण ठरविलेली सौद्याची किंमत पन्नास हजार रुपये आम्हास मंजूर आहे,पण तेवढी रक्कम आम्हास आताच तुम्ही दिली पाहिजे."

दीनदयाळने ही अट मान्य केली. मोठ्या खुषीतच तो घरी परतला. त्याने विचार केला, पन्नास हजार रुपये देऊन एक लाख रुपये घेणं काही वाईट नाही. लाख नाही निदान पन्नास हजार रुपये तरी मिळतील. काय माझं नशीब शिकंदर आहे. सात दिवसात पन्नास हजारांची प्राप्ती. घरी आल्याबरोबर आपल्या मुनीमाकरवी पन्नास हजार रुपये त्याने रामचरणकडे पाठवून दिले.


दुसऱ्या दिवसापासून दीनदयाळ रामचरणकडे जाऊ लागला आणि रामचरणने दिवसभरांत मिळविलेली भिक्षा घेऊ लागला. अशा रीतीने सहा दिवस निघून गेले. आता मात्र दीनदयाळला काळजी वाटू लागली. सातवे दिवशी तो पुन्हा गणपतीच्या मंदिरात गेला. त्याने पाहिले की, श्रीशंकर पार्वतीमाईसह पुन्हा मंदिरात

आले होते. श्रीशंकर व गणपती यांचे संभाषण ऐकण्यासाठी त्याने भिंतीला कान लावला. अरे पण हे काय झाले ? त्याचा कान भिंतीला चिकटून बसला. दीनदयाळने तो सोडवून घेण्याची खूप धडपड केली. पण कानाची तिळभरही सुटका झाली नाही तेव्हा उजव्या हाताने तो, कान सोडविण्याचा प्रयत्न करू लागला. तेवढ्यांत त्याचा उजवा हातही भिंतीला चिकटून बसला.

इकडे श्रीशंकराने गणपतीस विचारले, "वत्सा, तुझ्या दारात बसणाऱ्या भिकाऱ्याच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था तू केली आहेस ना ?" गणपती म्हणाला, "होय पिताजी, त्याला आतापर्यंत मी पन्नास हजार रुपये मिळवून दिले आहेत. बाकी राहिलेल्या पन्नास हजारासाठी दीनदयाळ नावाच्या एका लोभी आणि कंजूष श्रीमंताला भिंतीला चिकटवून ठेवले आहे. या दीनदयाळाने गोरगरिबांना लुबाडून खूप पैसा मिळविला आहे. दिलेले पैसे चौपटीने घेताना त्याने गरिबावर कधीच दया दाखविली नाही. अशा रीतीने त्याने लाखो रुपये मिळविले आहेत. आता जोपर्यंत तो रामचरण भिकाऱ्याला आणखी पन्नास हजार रुपये देणार नाही तोपर्यंत तो असाच भिंतीला चिकटून राहील."

गणपतीचे बोलणे ऐकून दीनदयाळ मोठ्या दुःखाने भिंतीवर आपले डोके आपटू लागला. त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. जेव्हा त्याने घरातून पन्नास हजार रुपये मागवून रामचरणला दिले तेव्हांच त्याची भिंतीपासून सुटका झाली.

या प्रसंगानंतर दीनदयाळाचा लोभी आणि कंजूष स्वभाव नाहीसा झाला. तो गोरगरिबांना दानधर्म करून मदत करू लागला. त्याच्या हितासाठी तो रात्रंदिवस झटू लागला. आणि त्यात त्याला आतापर्यंत कधीच न मिळालेले समाधान प्राप्त झाले.



# बाळकृष्ण शास्त्री

फार वर्षांपूर्वी कुसुमपुरात बाळकृष्ण नावाचा एक ब्राह्मण राहात होता. लहानपणी गुरूच्या आश्रमातून पळून आल्यामुळे त्याला कोणत्याही प्रकारची विद्या अवगत नव्हती. ज्याला विद्या नाही त्याला धन कसे मिळणार ? बाळकृष्ण विद्येच्या आणि धनाच्या बाबतीत दरिद्रीच राहिला. त्याचे कसेबसे लग्न झाले. पूर्वी स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी तो चार घरी भिक्षा मागत असे. आता तो दहा घरी भिक्षेकरिता जाऊ लागला. त्याची बायको

सुशीला स्वभावाने गरीब होती. वाढत्या संसाराबरोबर तिलाही शेजाऱ्यापाजाऱ्यांची घरकामे करावी लागत होती. संसाराचा गाडा मोठ्या कष्टाने रेटला जात होता.

एके दिवशी घोड्यावरून प्रवास करीत तीर्थयात्रेला निघालेला श्रीधर नावाचा एक व्यापारी अचानकपणे बाळकृष्णाच्या दारी आला. त्याला पाहून बाळकृष्णाला मोठे आश्चर्य वाटले. कारण तो दरिद्री असल्यामुळे कोणीही त्याच्या घरी येत नसे. बाळकृष्णही बोलावल्याशिवाय कोणाच्या घराची पायरी चढत नसे. तेव्हा एका अनोळखी माणसाला आपल्या दाराशी घोड्यावरून खाली उतरताना पाहून तो गोंधळून गेला. त्याची गोंधळलेली मुद्रा पाहून श्रीधर म्हणाला, "भल्या माणसा, असा गोंधळून जाऊ नकोस. गावातल्या सर्व धर्मशाळा भरल्या आहेत. मला फक्त रात्रीच्या मुक्कामाकरिता झोपण्यापुरती जागा हवी आहे. तू सदाचरणी आहेस, असं कळलं. तेव्हां तुझ्या घराच्या पडवीत माझी सोय करशील काय ?" "हो, हो, करीन की, पण––" "जेवणाबद्दल तुम्हाला म्हणायचं ना ? त्याची सोय मी केली आहे. ती काळजी तुम्हाला नको. तीर्थयात्रेला निघालेला मी प्रवासी आहे. कुणालाही त्रास न देता खाण्यापिण्याची व्यवस्था माझी मीच करीत असतो," श्रीधर म्हणाला. हे श्रीधरचे बोलणे ऐकून बाळकृष्णाला बरे वाटले. पोटभर जेवण मिळण्याची त्यालाच पंचाईत. मग पाहुण्यांची जेवणाची व्यवस्था करणे महाकठीण काम होते.

संध्याकाळी श्रीधर जेवणासाठी बाहेर पडला, तेव्हा बाळकृष्ण आपल्या पत्नीस म्हणाला, "हे बघ सुशीला, माझ्या डोक्यात एक चांगली कल्पना आली आहे. मला माहीत आहे तुला ती आवडणार नाही. पण त्या कल्पनेप्रमाणे वागण्याचे आपण ठरविले

तर आपणास चार पैसे मिळून दोन घास चांगले अन्नतरी मिळेल. खरं सांगू, भिक्षा मागण्याचा मला आता फार कंटाळा आला आहे." "अहो, पण सांगा की तुमच्या डोक्यातली कल्पना ?" "मुकाट्याने ऐकणार असशील तर सांगतो." "ऐकते, ऐकते, सांगा," सुशीला म्हणाली, "तुमचं सांगणं झाल्यावर मग मी बोलते."

"हे बघ", बाळकृष्ण म्हणाला, "आपला पाहुणा रात्री गाढ झोपला म्हणजे त्याचा घोडा गुपचुप घेऊन जायचा आणि आपल्या गावाच्या उत्तरेकडे असलेल्या अरण्यातील एका झाडाला बांधून ठेवायचा. सकाळ झाली की घोडा हरवला म्हणून पाहुणा गोंधळ करील. तेव्हा तू त्याला म्हणायचं, 'माझे धनी चांगले ज्योतिषि आहेत. त्यांना विचारा, ते तुमच्या घोड्याचा शोध लावून देतील.' मी सांगितल्याप्रमाणे पाहुण्याला त्याचा घोडा सापडेल. तो खूष होईल, आणि मला बक्षीस देईल. शिवाय आपण त्याला रात्रीच्या मुक्कामाकरिता जागा दिली त्याबद्दल तो काहीतरी द्रव्य देणार आहेच." सुशीला विचारांत पडली. दारी आलेल्या पाहुण्याला फसविणं चांगले नाही. हे तिला पटत होते. पण खाण्यापिण्याच्या बाबतीत रोजच सर्वांचे होत असलेले हाल तिला बघवत नव्हते. शिवाय जागोजागी ठिगळे लावलेली आपली आणि मुलाबाळाची वस्त्रे या दुःखी विचाराबरोबर तिला एका गोष्टीचे फार आश्चर्य वाटले. ती गोष्ट म्हणजे पैसे मिळावे किंवा मिळवावे अशी कल्पना आपल्या नवऱ्याच्या डोक्यात आलीच कशी ? सुशीला गप्प बसलेली पाहून बाळकृष्णाने विचारले, "सांग, माझी कल्पना तुला पसंत आहे का ?" "काय करायचं–" सुशीला म्हणाली, "आहे असं म्हणण्याची वेळच आली आहे."

जेवण करून आल्यावर श्रीधरने पडवीच्या खांबाला आपला घोडा बांधला. आणि पडवीत पथारी टाकली. पोटभर जेवण झाल्यामुळे आणि प्रवासाच्या दगदगीने त्याला लवकरच गाढ झोप लागली. बाळकृष्ण जागाच होता. श्रीधराच्या घोरण्याचा आवाज ऐकून तो उठला. बाहेर येऊन त्याने खांबाला बांधलेली घोड्याची दोरी सोडली. आणि घोड्याला घेऊन तो अरण्याच्या दिशेने झपझप पावले टाकू लागला. अरण्याच्या सीमेवर येताच तेथील एका पिंपळाच्या झाडाला त्याने घोडा बांधला. आणि मोठ्या त्वरेने घरी परत येऊन शांतपणे झोपी गेला.

कोंबडा आरवल्याबरोबर श्रीधरला जाग आली. तो उठून बसला. पाहतो तो पडवीच्या खांबाला बांधलेला घोडा नाहीसा झालेला. श्रीधर ताडकन् उभा राहिला. त्याने इकडे तिकडे पाहिले. घोडा कुठेच दिसेना. कदाचित् दोरी तोडून तो जवळपास चरत असेल अशा विचाराने त्याने चौफेर थोडे दूरवर जाऊन पाहिले. पण घोड्याचा पत्ता काही लागला नाही. श्रीधर निराश होऊन परत आला. त्याने बाळकृष्णाला हाक मारून म्हटले, "अहो, माझा घोडा हरवला. आता पुढचा प्रवास मी कसा करूं?" "हरवला? तो कसा काय?" बाळकृष्ण आश्चर्य दाखवीत उद्गारला. "रात्री तुम्ही तो नीट बांधून ठेवला होता ना?" "हो, अगदी चांगला बांधून ठेवला होता. आता कसं करायचं!" श्रीधर खिन्न होऊन म्हणाला. हा गोंधळ शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या कानी गेल्यामुळे त्यांचीही गर्दी झाली होती. तितक्यात सुशीला पुढे झाली. ती श्रीधरला म्हणाली, "माझ्या धन्याला चांगलं भविष्य सांगता येते. घोडा कुठे गेला हे त्यांना विचारा. ते तुम्हाला त्याचा ठावठिकाणा सांगतील." श्रीधरने बाळकृष्णाला प्रश्नकुंडली

मांडून घोड्याचा पत्ता सांगा असा आग्रह केला. तेव्हां बाळकृष्णाने कोनाड्यातून एक जुने पंचांग काढले. त्यात बघून, हाताची बोटे मोजीत, चारी दिशांकडे पाहून तो शांतपणे म्हणाला, " महाराज, मध्यरात्री तुमच्या घोड्याची चोरी झाली आहे. चोरांनी तो घोडा गावाबाहेर असलेल्या अरण्यात पिंपळाच्या झाडाला बांधून ठेवला आहे. तुम्ही जर ताबडतोब तेथे गेला तर तो तुम्हाला मिळेल. नाहीतर–" पण बाळकृष्णाचे पुढचे बोलणे ऐकण्यास श्रीधर तेथे थांबला नाही तो अरण्याच्या दिशेने धावत गेला.

थोड्या वेळाने श्रीधर आपला घोडा घेऊन बाळकृष्णाच्या घरी परत आला. बाळकृष्णाच्या अचूक भविष्याने आपला हरवलेला घोडा परत मिळाला याचा त्याला फार आनंद झाला होता. त्याने बाळकृष्ण नको नको म्हणत असताही पाच मोहरा त्याच्या हातावर ठेवल्या. शिवाय रात्रीच्या मुक्कामाला जागा दिली म्हणून श्रीधरने बाळकृष्णाला आणखी एक मोहर दिली. आणि त्याचा मोठ्या प्रेमाने निरोप घेऊन श्रीधर मार्गस्थ झाला.

या प्रसंगानंतर बाळकृष्णाने भिक्षा मागणे सोडून दिले. आणि सुशीलेलाही शेजाऱ्यापाजाऱ्यांची कामे करण्याची जरूरी भासेनाशी झाली. आपल्या अचूक भविष्याने बाळकृष्णाने व्यापाऱ्याचा हरवलेला घोडा त्याला परत मिळवून दिला अशी बाळकृष्णाची प्रसिद्धी झाली होती. त्यामुळे त्याच्या घराच्या जवळपासचे लोक काही हरवले,कोणी आजारी पडले की त्याच्याकडे ज्योतिष विचारण्यासाठी येऊ लागले. कर्मधर्मसंयोगाने तो जे सांगेल ते अनुभवास येऊ लागल्यामुळे लोकांची त्याच्यावर अधिकच श्रद्धा बसली. बाळकृष्णाला दररोज कमीजास्त प्रमाणात द्रव्य मिळू लागले. त्यामुळे त्याची अन्नवस्त्राची विवंचना दूर झाली. त्याच्या

चंद्रमौळी घराचे रूपही पालटले. ते आता नीटनेटके आणि प्रसन्न दिसू लागले. त्याला वाटले आपल्या डोक्यातील कल्पना शुभ ठरली. तिने लक्ष्मीची प्राप्ती करून दिली.

काही दिवसांनी कुसुमपुरातील धनभद्र नावाच्या एका श्रीमंत व्यापाऱ्याच्या मुलीच्या गळ्यातील हिरेजडित रत्नहार चोरीस गेला. चोराचा पत्ता लागेना म्हणून धनभद्राने विद्वान ज्योतिषी म्हणून प्रसिद्धीस आलेल्या बाळकृष्णास बोलावणे पाठविले. बाळकृष्ण धनभद्राच्या भव्य राजशाही वाड्यात गेल्यावर धनभद्राने त्याचे मोठ्या थाटांत स्वागत केले. त्याला उच्चासनावर बसवून धनभद्र म्हणाला, "आचार्य, दोन दिवसापूर्वी माझ्या मुलीच्या गळ्यातील हिरेजडित रत्नहार चोरीस गेला आहे. चोहीकडे तपास केला, नोकराचाकरांची झडती घेतली. पण रत्नहार काही सापडला नाही. रत्नहाराला जडविलेले हिरे फार दुर्मिळ आहेत. त्यांची किमतच दहा हजार मोहरा होईल. तेव्हा तो हार कोणी चोरला व तो परत मिळेल का हे सांगण्याची आपण कृपा करावी." हे धनभद्राचे बोलणे ऐकून बाळकृष्ण मोठ्या विचारात पडला. त्याला वाटले आपल्या कसोटीची वेळ आली. यातून पार पडण्यात यश आले नाही तर आपली सगळीकडे नाचक्की होईल. मिळविलेला लौकिक जाईल. आणि पुन्हा भिक्षेची झोळी घेण्याची पाळी येईल. केवळ देवाची किंवा दैवाची कृपा म्हणूनच आतापर्यंत जे जे सांगत आलो ते खरे होत गेले — पण आता —."

बाळकृष्ण धनभद्राला म्हणाला, "हे पहा धनभद्रजी, आजचा दिवस मी इथच राहतो. तुमच्या प्रश्नाचं उत्तर थोडं अवघड आहे. त्यासाठी मला मंत्रतंत्राची मदत घेतली पाहिजे. चोरी कोणी

केली ते मी उद्या सकाळी निश्चितपणे तुम्हांला सांगतो." "ठीक आहे" असे म्हणून धनभद्राने आपल्या नोकरास बोलावले आणि बाळकृष्णाच्या राहण्याची व्यवस्था एका चांगल्या सुसज्ज दिवाण-खान्यात करण्यास त्यास सांगितले.

झाला तर सगळाच मोठा लाभ नाही तर सगळीच हानी असे विचित्र संकट बाळकृष्णावर आले होते. या संकटातून कसे पार पडावे, या विचाराने तो फार चिंताक्रांत झाला. कर्मधर्म-संयोगाने चोरीचा काही सुगावा लागेल या हेतूने बाळकृष्णाने धनभद्राच्या सर्व दासदासींना बोलावून त्यांना आडवेतिडवे प्रश्न विचारले. धनभद्राच्या मुलीलाही बोलावून तिला विचारले, पण व्यर्थ. रत्नहार सापडेल अशी कोणतीही खूण कोणाच्याही बोलण्या-चालण्यात बाळकृष्णाला दिसून आली नाही.

संध्याकाळी धनभद्राच्या वाड्याभोवती असलेल्या रम्य बागेत बाळकृष्ण थुईथुई उडणाऱ्या कारंज्याच्या काठावर खूप वेळ विचारमग्न होऊन बसला. सभोवती रंगीबेरंगी फुले फुललेली होती. झाडावर विसाव्यासाठी आलेल्या पक्ष्यांची मधुर किलबिल चालू होती, पण बाळकृष्णाचे तिकडे लक्ष नव्हते. उद्या सकाळी धनभद्राला काय सांगावयाचे या प्रश्नाचे उत्तर शोधून काढण्यात तो गढून गेला होता. पण त्याला योग्य असे उत्तर सुचलेच नाही.

रात्री भोजन करून बाळकृष्ण अंथरुणावर पडला. त्याला झोप येईना. रात्रीचा पहिला प्रहर संपला होता. त्या सुमारास धनभद्राची कल्पना नावाची दासी दिवाणखान्याच्या बंद दरवाज्याला कान लावून उभी होती. कारण तिनेच धनभद्राच्या मुलीचा हिरे-जडित रत्नहार चोरला होता. म्हणून तिला बाळकृष्णाची भीती वाटत होती. बळेच आपणास ज्योतिषी बनविणाऱ्या आपल्या

डोक्यातील कल्पनेवर बाळकृष्ण चिडला होता. तिनेच फजितीची वेळ आणली असे त्याला वाटले. म्हणून स्वत:शी मोठ्याने बोलत बाळकृष्ण तिची निंदा करू लागला. " हे दुष्ट कल्पने, तू फार घातकी आहेस. ज्यांच्याकडे तू राहतेस त्याचेच तू अकल्याण करतेस. आता धनभद्राकडून आणि लोकांकडून जी शिक्षा मिळेल ती सहन कर."

या थोर ज्योतिष्याने आपणास ओळखले आहे अशी खात्री पटून कल्पना दासी अत्यंत घाबरली. बंद दारावर हलकेच टिचक्या मारून तिने बाळकृष्णास दार उघडावयास लावले. दार उघडताच तिने बाळकृष्णाचे पाय घट्ट धरले आणि स्फुंदून स्फुंदून रडत ती म्हणाली, " महाराज, क्षमा करा. क्षमा केली असे शब्द तुमच्या तोंडातून बाहेर पडल्याशिवाय मी तुमचे पाय सोडणार नाही. आपण जिला उद्देशून स्वत:शी बोलत होता तीच मी दुष्ट कल्पना. मीच धन्याच्या मुलीचा रत्नहार चोरून बागेतील जाईच्या कुंजात लपवून ठेवला आहे. कृपा करून माझे नाव सांगू नका. नाहीतर माझी नोकरी जाऊन मी अन्नाला महाग होईन. या दीन दासीवर दया करा."

कल्पना दासीचे हे बोलणे ऐकून विस्मयचकित व अतिशय आनंदित झालेला बाळकृष्ण मोठ्या रुबाबात म्हणाला, " असे होणार हे मला माहीतच होते. तू मला शरण आली आहेस. मी तुझं अकल्याण करणार नाही. जा. पुन्हा असं कधीहि करू नकोस." कल्पना दासी निघून गेल्यावर बाळकृष्ण स्वत:शी म्हणाला, " जिच्यामुळे मी संकटात सापडलो त्या माझ्या कल्पनेची मी निंदा केली आणि चोरी करणारी कल्पना माझ्यापुढे दत्त म्हणून उभी राहिली. दैव पाठीशी असलं म्हणजे अशक्य गोष्टही शक्य होते